दैनिक राष्ट्र सह्याद्री

# राजापूर येथे बिबट्याचा हल्ला; शेतकरी गंभीर जखमी

**श्रीगोंदा :** तालुक्यातील राजापूर परिसरात गव्हाच्या शेताला पाणी देत असताना गणेश महादेव शेळके यांच्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात शेळके गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आज पहाटे ढवळखोरी वस्ती परिसरातही बिबट्याने हल्ला केल्याची घटना समोर आली. या हल्ल्यात सुखदेव तुकाराम ढवळे यांचा पाळीव कुत्रा ठार झाला. तसेच आदल्या दिवशी रायगव्हाण येथे माणिक पठारे यांच्या शेळी वरती दिवसा बिबट्याने हल्ला केला आहे. तसेच राजापूर येथील दादा कवाष्टे यांच्या येथील चार शेळ्या बिबट्याने फस्त केले आहेत. घटनास्थळी वनरक्षक दिनेश भुमरे वनकर्मचारी हनुमंत रणदिवे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून घटनास्थळांचा पंचनामा केला आहे.



# राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत 'ध्रुव ग्लोबल' चॅम्पियन

## ११ सुवर्णपदकांसह ५ चषकांची कमाई; तेज जैन स्पर्धावीर




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** शिर्डी येथील गोल्डन क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय ५० बॉल क्रिकेट स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूल, संगमनेर चा पंधरा वर्षांखालील संघ चॅम्पियन ठरला. राज्यातील विविध शालेय संघांच्या सहभागात झालेल्या या स्पर्धेत ध्रुवच्या संघाने अकरा सुवर्णपदकांसह पाच चषके पटकावत वर्चस्व सिद्ध केले.

साखळी फेरीत ध्रुवने पुणे संघाचा ६४ धावांत गुंडाळत दणदणीत विजय मिळवला. उपांत्यपूर्व फेरीत अमरावतीविरुद्ध १३३ धावांचे आव्हान उभे करत प्रतिस्पर्ध्याला ५२ धावांत रोखले. उपांत्य सामन्यात धुळे संघावर ८० धावांनी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात नाशिकविरुद्ध ५० चेंडूत १३१ धावांचे लक्ष्य देत प्रतिस्पर्ध्याला अवघ्या ५० धावांत गुंडाळून विजेतेपद निश्चित केले.

स्पर्धेत दोन अर्धशतकांसह सर्वाधिक धावा करणाऱ्या तेज जैनला 'प्लेअर ऑफ द चॅम्पियन' पुरस्कार मिळाला. अंतिम सामन्यात ४८ धावा व दोन बळी घेणाऱ्या प्रणव काकडेला सामनावीर घोषित करण्यात आले. सोहम करपे उत्कृष्ट गोलंदाज ठरला, तर यश बियाणीला क्षेत्ररक्षणासाठी विशेष गौरव मिळाला.

संघात तेज जैन, श्रवण मुंदडा, आनंद बोरा, प्रणव काकडे, सोहम करपे, विनित भन्साळी, शौर्य फटांगरे, रुद्र अभंग, धनराज डाके, साहिल शिरसाठ व अद्वैत ढोली यांचा समावेश होता. क्रीडा प्रशिक्षक महेश जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने हे यश संपादन केले.

# भीषण अपघातात दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** काष्टी येथील श्रीगोंदा चौकात आज पहाटे झालेल्या भीषण रस्ते अपघातात दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. सचिन शिवाजी माने (वय ४०) व संतोष शिवाजी माने (वय ४३) अशी मृतांची नावे असून, या घटनेने काष्टी गावावर शोककळा पसरली आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही भाऊ पहाटे पाचच्या सुमारास दुचाकीवरून शिक्रापूर एमआयडीसीकडे कामासाठी निघाले होते. काष्टीतील श्रीगोंदा चौकात त्यांच्या वाहनाला अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. घरातील दोन कर्त्या पुरुषांचा एकाच वेळी मृत्यू झाल्याने माने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, काष्टीतील श्रीगोंदा चौक, अजनुज चौक व हायस्कूल परिसर हे अपघातप्रवण ठिकाणे बनत चालल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. जवळच शाळा व बाजारपेठ असल्याने येथे मोठी वर्दळ असते. मात्र वाहनांच्या वेगावर नियंत्रणासाठी गतिरोधक नसल्याने वारंवार अपघात होत असल्याचे सांगितले जाते.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाणे येथे अपघाताची नोंद करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने गतिरोधक, हायमास्ट दिवे व इशारा फलक बसवावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# टिपू सुलतानचा पुळका असल्यास पाकिस्तानात जावे : अक्षय कर्डिले

## हर्षवर्धन सपकाळ यांच्या पुतळ्याचे दहन




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** येथे युवा नेते अक्षय कर्डिलेंकडून हर्षवर्धन सपकाळ यांचा निषेध व्यक्त करून शिवाजी महाराजांच्या तुलनेवरील वक्तव्यावरून भाजपकडून तीव्र आंदोलन खेळण्यात आले त्यावेळी हर्षवर्धन सपकाळच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले आणि त्यावेळी जमलेल्या शिवप्रेमींनी घोषणाबाजी करत संताप व्यक्त करण्यात आला यावेळी शिवप्रेमींची मोठी उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतान बरोबर केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर राहुरी शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. युवा नेते अक्षय कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शनि चौकापर्यंत निषेध रॅली काढत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी पुतळा दहन करून जोडे मारत निषेध व्यक्त केला.

भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले यांनी निषेध मोर्चादरम्यान बोलताना सांगितले की, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केलेले वक्तव्य महाराष्ट्राच्या भावनांना ठेच देणारे असून ते अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिंदुस्तानचे दैवत असून त्यांच्या कार्याची आणि पराक्रमाची तुलना कोणत्याही अन्य ऐतिहासिक व्यक्तीशी करणे महाराष्ट्रातील जनतेला मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणले, गुलामगिरीची साखळी तोडली आणि न्यायनिष्ठ राज्यकारभार उभा केला, त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान सहन केला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

कर्डिले पुढे म्हणाले की, मतांच्या राजकारणासाठी काही नेते कोणत्याही थराला जात असून समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करतात. अशा प्रवृत्तीला महाराष्ट्रातील जनता कधीही माफ करणार नाही. शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या भावना दुखावणाऱ्या वक्तव्यांबाबत भाजपकडून तीव्र आंदोलन सुरूच राहील, असेही त्यांनी नमूद केले.

या आंदोलनावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते सकल हिंदू समाज आणि मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. शहरातील विविध भागातून कार्यकर्ते एकत्र येत घोषणाबाजी करत आंदोलनात सहभागी झाले. निषेध मोर्चामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिस प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी बंदोबस्त ठेवला होता.या प्रसंगी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा युवा नेते अक्षय शिवाजी कर्डिले, दादा सोनवणे राजेंद्र उंडे अरुण साळवे, प्रभाकर हरिचंद्र, सुनिल पवार,बाबासाहेब शिंदे, किशोर येवले, नयन शिंगी, सचिन मेहेत्रे, सदाशिव शेळके, अक्षय तनपुरे ,अक्षय भुजाडी ,गणेश खैरे, आण्णासाहेब शेटे, उमेश शेळके यांसह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते पदाधिकारी सकल हिंदू समाज शिवप्रेमी उपस्थित होते.

# वैजापूर शहरात विचित्र अपघात





वैजापूर शहरातील गजबजलेल्या म्हसोबा चौकात मंगळवारी सायंकाळी विचित्र तिहेरी अपघात झाला.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** शहरातील गजबजलेल्या म्हसोबा चौकात मंगळवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ट्रक, हायवा ट्रक व पिक अप रिक्षा यांच्यात विचित्र अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी रिक्षा चालकासह दोन ते तीन जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी त्वरित खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. ट्रॅकचालक पसार झाल्याचे समोर येत असून जखमीची नावे लगेच कळू शकली नाहीत. अपघाताच्या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला असलेल्या फळ वं भाजीपाला विक्रेत्यांचा माल रस्त्यावर सांडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले तसेच एका दुचाकीचाही चुराडा झाला. या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वैजापूर छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर म्हसोबा चौक हे अतिशय गजबजलेले ठिकाण असून येथून भरधावं वेगाने वाहनांची वर्दळ सुरु असते. मंगळवारी याच भागात एक हायवा ट्रक रस्त्याच्या कडेला उभा होता. प्रत्यक्षदर्शीनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रकने अगोदर त्याच दिशेने जाणाऱ्या पिकअप रिक्षाला धक्का दिल्याने ही रिक्षा रस्त्यावरील दुभाजकावर चढली.

त्यानंतर या ट्रकने कडेला उभ्या असलेल्या हायवाला जोराची धडक दिली. ही धडक इतकी जोराची होती कि हायवा काही फुट अंतर पुढे ढकलला जाऊन तो फळ व भाजीपाला विक्रेत्याच्या दुकानाला भिडला. तेथील लोकांनी तातडीने पळ काढल्याने मोठा अनर्थ टळला. भाजीपाला व फळ रस्त्यावर पडल्याने मोठे नुकसान झाले व एका दुचाकीचेही नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आढावा घेतला. म्हसोबा चौकात भरधावं वेगाने वाहने चालवली जात असल्याने काही दिवसांपासून अपघाताचे प्रमाण वाढल्याने पोलिसांनी लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# शनिशिंगणापूरचा पोलीस शिपाई लाच घेताना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर पोलीस ठाणे येथे कार्यरत पोलीस शिपाई अजय कृष्णा ठुबे (वय ३९, बक्कल क्र. ३२६) याला दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या पथकाने सोमवारी सायंकाळी सापळा रचून ही कारवाई केली. आरोपीस नेवासा न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी (दि. १८ पर्यंत) सुनावण्यात आली.

तक्रारदार (वय ३९) यांचे शनिशिंगणापूर मंदिरासमोरील कुऱ्हाट पार्किंग परिसरात पूजा साहित्य विक्रीचे दुकान आहे. भाविकांची वाहने दुकानासमोर उभी राहू नयेत म्हणून कारवाई टाळण्यासाठी दरमहा १,५०० रुपयांचा हप्ता मागितल्याची तक्रार करण्यात आली होती. दोन महिन्यांचे ३,००० रुपये देण्याची मागणी केल्याचा आरोप आहे. पडताळणीत २,००० रुपये तत्काळ व उर्वरित १,००० रुपये नंतर देण्याचे ठरल्याचे निष्पन्न झाले. ठरल्याप्रमाणे रक्कम स्वीकारताच पथकाने झडप घालून आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीकडून २,००० रुपयांची लाच रक्कम जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. कारवाई पोलीस अधीक्षक माधुरी केदार कांगणे व अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# शेततळ्यात तरुणाचा बुडून मृत्यू

**राहुरी :** तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील कार वस्ती लगत असलेल्या शेततळ्यात पडून एका ३५ वर्षीय इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १४ फेब्रुवारी रोजी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.



राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील रहिवासी लक्ष्मण सूर्यवंशी, वय ३५ वर्ष हे १३ फेब्रुवारी २०२६ रोजी घरापासून काही अंतरावर असलेल्या शेततळ्याकडे गेले होते. मात्र ते परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. अखेर दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह शेततळ्यात आढळून आला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. ग्रामस्थांनी तत्काळ राहुरी पोलिसांना कळविले. माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक देविदास कोकाटे, पोलीस हवालदार सुरज गायकवाड आदींनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह पाण्यातून बाहेर काढून पंचनामा केला.

यानंतर रुग्णवाहिका चालक निखिल भोसले यांच्या मदतीने मृतदेह शवविच्छेदनासाठी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करत आहेत.

दरम्यान मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. याबाबत सध्या आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून अधिक तपास राहुरी पोलिसांकडून सुरू आहे.

# राष्ट्रीय पातळीवर त्रिमूर्तीचे तिरंदाज झळकले

## ऑल इंडिया रायफल शुटिंगसाठी तीन खेळाडूंची निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा मान उंचावला आहे.

दि. २३फेब्रुवारी ते १मार्च २०२६ दरम्यान गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया रायफल शूटिंग स्पर्धेसाठी प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील खेळाडू वेदांत नितीन वाघमारे,तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील कु.तेजल प्रकाश वसावे,द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील कु. श्रुती अरुण साळुंखे या तिन्ही खेळाडूंची निवड झाली आहे.

यापूर्वी २०२५ मध्ये कझाकिस्तान येथे झालेल्या १६ व्या आशियाई रायफल शूटिंग स्पर्धेत वेदांत नितीन वाघमारे याने तीन सुवर्णपदके आणि एक कांस्यपदक पटकावून देश, राज्य तसेच नेवासा तालुक्याचे नाव उज्ज्वल केले होते. तसेच दि. २ ते १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या आशियन शूटिंग चॅम्पियन शिपमध्ये ५० मीटर थ्री पोझिशन रायफल शूटिंग या प्रकारात ज्युनिअर गटातून खेळले होते







या यशामागे त्रिमूर्ती रायफल शूटिंग अॅकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव काळे तसेच सीनियर कॉलेजचे फिजिकल डायरेक्टर प्रा.नितीन चिरमाडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड.सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा ड.स्नेहल चव्हाण-घाडगे पाटील,सचिव मनीष घाडगे पाटील,सहसचिव डॉ.श्रुती आमले-घाडगे पाटील, विश्वस्त चेतन चव्हाण पाटील,सीनियर कॉलेज समन्वयक डॉ.अनुराधा गोरे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे,उपप्राचार्य प्रा. निकिता बर्गे तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

त्रिमूर्ती संकुलामध्ये आर्चरी,रायफल शूटिंग, कुस्ती, कबड्डी, किक बॉक्सिंग, व्हॉलीबॉल, फुटबॉल, थलेटिक्स आणि क्रिकेट या विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षक अभिजीत दळवी, छबुराव काळे, संभाजी निकाळजे, महादेव काकडे,अशोक पानकडे, नितीन चिरमाडे, साहेबराव गाणे, मुकेश जाधव, गणेश शिंदे, निलेश पैठणे, राहुल शेळके, शैलेश दाणे, गौरव दाणे, समीर शेख तसेच सैनिकी प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनामुळेच खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवत आहेत.

## संपादकीय

### भारताची डळमळीत भूमिका जागतिक कर न्यायासाठी धोक्याची!

जागतिक अर्थव्यवस्थेत कर चोरी आणि करबचाव ही एक मोठी समस्या बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अति-श्रीमंत व्यक्तींमुळे जगाचे दरवर्षी सुमारे ५०० अब्ज डॉलर्सचे नुकसान होत आहे. हे पैसे हवामान बदलाचा सामना करण्यासाठी, आरोग्य आणि शिक्षणासारख्या मूलभूत गरजांसाठी वापरता आले असते. अशा पार्श्वभूमीवर, 'संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय कर सहकार्य चौकट समझोत्या' (यूएन इंटरनॅशनल टॅक्स कोऑपरेशन फ्रेमवर्क कन्व्हेन्शन) साठी नुकत्याच पार पडलेल्या वाटाघाटींची चौथी फेरी अत्यंत महत्त्वाची होती. ५ ते १३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान चाललेली ही बैठक अनिर्णित राहिली, आणि यामुळे जगातील विकसनशील देशांच्या आशा धूसर झाल्या आहेत. प्रश्न असा आहे की, 'ग्लोबल साउथ'चे नेतृत्व करणारा दावा करणारा भारत या प्रक्रियेत का कचरतो आहे? आणि पुढील वाटाघाटीपूर्वी भारताने कोणती पावले उचलली पाहिजेत?

या बैठकीत कर अधिकारांचे न्याय्य वाटप, अति-श्रीमंतांवर प्रभावी कर आकारणी, अवैध आर्थिक व्यवहार रोखणे आणि जागतिक कर चोरीला लगाम घालणे हे मुख्य मुद्दे होते. ही चर्चा केवळ आर्थिक नव्हती, तर नैतिक आणि सामाजिक न्यायाचीही होती. 'एपस्टीन कांडा'सारख्या प्रकरणांमुळे हे स्पष्ट झाले आहे की, कमी कर आकारणीमुळे श्रीमंत वर्गाच्या अनैतिक कृत्यांना प्रोत्साहन मिळते. तरीही बैठक अनिर्णित राहिली, आणि आता २०२७ पर्यंत या समझोत्या मंजूर होण्याची शक्यता धूसर दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे श्रीमंत पाश्चात्त्य देश (ग्लोबल नॉर्थ) आणि त्यांच्या 'ओईसीडी' संघटनेचा दबाव. ते या समझोत्या केवळ पोकळ तत्त्वांचा दस्तऐवज बनवू इच्छितात, ज्यात कायदेशीर बंधनकारक अटी नसतील.भारताची भूमिका येथे चिंताजनक आहे. २०२४ मध्ये नैरोबीत पार पडलेल्या बैठकीत भारताने आफ्रिका समूहासोबत खांदा लावून कार्यकक्षा निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, न्यूयॉर्कमधील या ताज्या फेरीत भारतीय शिष्टमंडळ आपल्या मूळ भूमिकेपासून दूर गेल्याचे दिसते. निरीक्षकांच्या मते, भारत आता ग्लोबल नॉर्थच्या सुरात सूर मिसळत आहे. हे बदल का? याचे उत्तर देशांतर्गत राजकारणात आहे. २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात कॉर्पोरेट वर्गाला सवलती देण्यात आल्या आहेत – सरचार्जमध्ये कपात, करमुक्त बायबॅकचे फायदे – तर आरोग्यासाठी केवळ १.९ टक्के तरतूद आहे, जी जीडीपीच्या २.५ टक्के या जुन्या आश्वासनापेक्षाही कमी. ही 'इंडिया, नॉट भारत'ची धोरणे आहेत, ज्यात अब्जाधीशांची संपत्ती वाढते, पण सामान्य जनतेची सार्वजनिक सेवा कोलमडते.

भारताची ही डळमळीत भूमिका जागतिक स्तरावर 'ग्लोबल साउथ'च्या नेतृत्वाला कमकुवत करते. २०२४ मध्ये जी-७७ आणि आफ्रिका गटाच्या एकजुटीने ओईसीडीच्या दबावाला नकार देण्यात यश मिळाले होते. आता भारताने पुन्हा त्या भूमिकेकडे परतणे आवश्यक आहे. पोकळ समझोता म्हणजे कर चोरीला मिळालेले यशच असेल. त्याऐवजी, बहुराष्ट्रीय कंपन्यांवर 'युनिटरी टॅक्सेशन' लागू करणारा, डिजिटल आणि खाणकाम क्षेत्रातील कर चोरी रोखणारा आणि 'प्रदूषण करणाऱ्याने पैसे भरावेत' (पोल्यूटर शुड पे) सारख्या तत्त्वांचा समावेश असलेला ठोस, बंधनकारक करार हवा. पुढील वाटाघाटीपूर्वी भारताने काही महत्त्वाची पावले उचलली पाहिजेत. जी-७७ आणि आफ्रिका आघाडी मजबूत करणे. श्रीमंत राष्ट्रांच्या दबावाला बळी न पडता, समझोत्या 'पोकळ' करण्याच्या प्रयत्नांविरुद्ध ठाम उभे राहणे. केवळ सामान्य तत्त्वांचा करार नाकारणे. शाश्वत विकासासाठी योगदान देणारा, कर अधिकारांचे न्याय्य वाटप करणारा आणि कायदेशीर बंधनकारक अटी असलेला समझोता करण्यासाठी आग्रही राहणे. देशांतर्गत आणि जागतिक धोरणांमध्ये मेळ घालणे. जागतिक न्याय्य कर प्रणालीसाठी देशांतर्गत कर प्रणाली अधिक प्रगत बनवणे. विकसनशील देशांच्या हिताचे रक्षण करतानाच, भारतीय जनतेच्या गरजांना प्रतिसाद देणारी कर नीती आखणे, असे नियोजन भारत भविष्यात करू शकेल. 'एशियन पीपल्स मूव्हमेंट ऑन डेट अँड डेव्हलपमेंट'च्या समन्वयक लिडी नॅकपिल यांच्या शब्दांत, 'अति-श्रीमंतांनी स्वतःचे नियम स्वतःच लिहिण्याचे युग आता संपले पाहिजे. हवामान बदलाची संकटे वाढत असताना, 'प्रदूषण करणाऱ्याने कर भरणे' आणि 'संपत्ती कर' या कल्पना अनिवार्य बनल्या आहेत. बड्या देशांच्या नादी लागून स्थितीवादी भूमिका घ्यायची, की दिल्लीच्या रस्त्यांपासून आफ्रिकेच्या खेड्यांपर्यंत पसरलेल्या कोट्यवधी लोकांसाठी लढायचे? हे आता भारताला ठरवावे लागेल. जागतिक न्यायाची ही लढाई जिंकण्यासाठी भारताने आपली भूमिका ठाम करावी, अन्यथा 'ग्लोबल साउथ'चे स्वप्न अधांतरीच राहील.

# विनयभंग करणाऱ्या माजी सरपंचांना तातडीने अटक करा : 'अन्यथा काम बंद'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील गोधेगाव येथे कर्तव्यावर असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी महिलेला आक्षेपार्ह शब्दाचा वापर करत महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडलेली असून सदर अधिकारी महिलेने माजी सरपंच अशोक विठ्ठल भोकरे याच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. मात्र अद्यापही आरोपीस अटक झाली नसल्याने ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने सदर घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीस तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे.

कोपरगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.संदीप दळवी यांना या संदर्भात निवेदन दिले आहे. दोन दिवसात या आरोपीस अटक झाली नाही तर काम बंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.गटविकास अधिकारी दळवी यांना निवेदन देताना ग्रामपंचायत संघटनेचे तालुकाध्यक्ष जालिंदर पाडेकर, दिगंबर बनकर, सुरेश रहाणे, ज्योती होन, श्रीमती नजन, श्रीमती शेलार, सुधाकर पगारे, सचिन वीर, रफिक सय्यद, संदीप वाडेकर ,सिद्धार्थ होन, राजेंद्र टिळेकर ,किरण राठोड, योगेश देशमुख, कृष्णकांत अहिरे, प्रदीप कोल्हे, सोमवंशी, सखाहरी थोरात, सुप्रिया टोरपे, नारायण खेडकर, गंगाधर राऊत आदी उपस्थित होते.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिलेले निवेदन वरिष्ठांपर्यंत पाठवण्यात येणार असल्याचे आश्वासन बिडीओ दळवी यांनी दिले. तर ग्रामपंचायत अधिकारी जालिंदर पाडेकर यांनी घटनेचा निषेध करत पोलीस स्टेशनने आरोपीस तात्काळ अटक करण्याची मागणी केली.



# मामा, नाना, आबा यांच्या विचारांतील राजकारणाची गरज : शिवाजी शिंदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : सहकार, शेती व शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टीचे नेतृत्व करणारे, अशोक सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष स्व. अण्णासाहेब पटारे पाटील (अप्पा) यांच्या पुण्यतिथीनिमित्त टाकळीभान विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभागृहात ग्रामस्थांच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून बोलताना शिवाजीराव शिंदे म्हणाले की, स्व. अण्णासाहेब पटारे यांच्या काळात झालेला टाकळीभानचा विकास हा उल्लेखनीय आणि दूरदृष्टीचा होता. त्यांनी गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक महत्त्वपूर्ण कामे उभी केली. टेल-टँक व गाव तळ्याचे काम, गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी, रयत शिक्षण संस्थेच्या शाळेची भव्य इमारत तसेच सोसायटीची इमारत, वस्तीगृह अशी अनेक विकासकामे त्यांच्या नेतृत्वात पूर्ण झाली. आजच्या काळात थोरात मामा, बाळाजीनाना, अण्णासाहेब आप्पा आणि शंकरराव आबा



कोकणे यांच्या विचारांचे राजकारण हीच काळाची गरज आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सेवा संस्थेचे अध्यक्ष मंजाबापू थोरात यांनी आपल्या तरुणपणातील स्व. अण्णासाहेबांच्या नेतृत्वाखालील राजकीय अनुभव आणि त्यांच्याकडून मिळालेले मार्गदर्शन यांचा उल्लेख केला. अण्णासाहेबांनी वेळोवेळी पाठीवर दिलेल्या कौतुकाच्या थापेच्या आठवणी त्यांनी भावनिक शब्दांत सांगितल्या आणि स्व. अण्णासाहेब पटारे यांच्या कार्याचा आदर्श घेऊन गावाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे यांनी आपल्या वडिलांचे व स्व. अण्णासाहेब यांचे जिव्हाळ्याचे संबंध अधोरेखित करत जुन्या आठवणींना उजाळा देत स्व. अण्णासाहेब पटारे सर्वांना सामावून घेणारे नेतृत्व असल्याचे सांगितले. माजी उपसरपंच भारत भवार यांनी स्व. अण्णासाहेब पटारे यांच्यासारख्या स्वच्छ व चांगल्या विचारांच्या नेतृत्वाची राजकारणात आजही गरज असल्याचे मत व्यक्त केले. धनराज कोकणे व नानासाहेब लेलकर यांनीही स्व. अण्णासाहेबांसोबत केलेल्या कामांच्या आठवणी सांगत त्यांना आदरांजली वाहिली यावेळी स्व. अण्णासाहेब पटारे यांचे जुने सहकारी लहानभाऊ नाईक, एकनाथ लेलकर, रामकिसन मैड, ज्ञानदेव साळुंके, बंडूतात्या पटारे यांच्या हस्ते अण्णासाहेब पटारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अशोकचे मा. व्हा. चेअरमन दत्तात्रय नाईक, सरपंच अर्चना रणनवरे, अशोकचे संचालक यशवंत रणनवरे, विलास दाभाडे, बापूराव त्रिभुवन,माजी चेअरमन एकनाथ पटारे, रावसाहेब वाघुले,अनिल कोकणे , दत्तात्रय पटारे, भाऊसाहेब पटारे, बापूसाहेब शिंदे, सुनील बोडखे, बाबासाहेब लोखंडे, अनिल माने, संदीप बनकर, संजय पटारे, तुकाराम बोडखे, मच्छिंद्र कोकणे, सुभाष पटारे, शिवाजी पवार, बाळकृष्ण थोपटे, अण्णासाहेब दाभाडे,रामनाथ ब्राह्मणे, रघुनाथ शेळके यांच्यासह गावातील पदाधिकारी, मान्यवर, पत्रकार बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपसरपंच पाराजी पटारे यांनी केले. तर आभार स्व. अण्णासाहेब यांचे नातू बाजार समितीचे संचालक मयुर पटारे यांनी मानले.

# हंडीनिमगावच्या विविध प्रश्नांसंदर्भात खा. वाकचौरे यांची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील हंडीनिमगाव येथील विविध प्रश्नांच्या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य व युवा कार्यकर्ते किरण जाधव यांनी शिर्डी दक्षिण मतदार संघांचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांना निवेदन देऊन विविध प्रश्नांच्या बाबत सविस्तर चर्चा केली. खा. वाकचौरे हे स्वयंभु त्रिवेणीश्वर येथे दर्शनाला आले असता गावातील विविध प्रश्नावर साईनाथ ग्रुपचे



अध्यक्ष युवा नेते किरण जाधव यांनी भेट घेऊन गावात असलेल्या विविध समस्या तसेच त्रिवेणीश्वर नदीवर असलेल्या प्रलंबित पुलाच्या प्रश्नांच्या संदर्भात चर्चा केली. सदरचा पूल हा वाहतुकीसाठी दळण वळणाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचा असून पावसाळ्यात जाधव वस्ती च्या नागरिकांचा गावासोबत संपर्क तुटलेल्या घटनेची त्यांनी आठवण करून दिली.

यावेळी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी गांभीर्याने या प्रश्नाची दखल घेऊन लवकरात लवकर यावर मार्ग काढू असे आश्वासन देण्यात आले. यावेळी हंडी निमगाव ग्रामविकास सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब साळुंके, किरण गरड,कुणाल पिसाळ, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पिसाळ, अनिल वरे, संतोष उंडे, जालिंदर भणगे, बाळासाहेब जाधव, सुरेंद्र क्षीरसागर, किरण पवार, अरुण गरड, गणेश भणगे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# हनुमान मंदिरात मुस्लिम बांधवांच्या वतीने फराळाचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील जेऊर हैबती येथे हनुमान मंदिरात दर शनिवारी होत असलेल्या आरती व हनुमान चालीसा कार्यक्रम प्रसंगी आलेल्या भाविकांना गावातील मुस्लिम समाजाच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात आले. यामुळे येथे हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडले.

नेवासा तालुक्यातील जेऊर हैबती हे गाव हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते, जेऊर हैबती येथील हिंदू मुस्लिम समाज एकत्रितपणे गुण्यागोविंदाने रहातात,



गावात बांधण्यात आलेल्या मस्जिदचे उदघाटन हे वारकरी संप्रदायातील प्रबोधनकार ह भ प नाना महाराज सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले होते.त्यावेळी गावातील दोन्ही समाजाचे लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

झालेल्या हनुमान आरती व चालीसा पठण कार्यक्रम प्रसंगी महंत देविदास महाराज म्हस्के,ह भ प कृष्णा महाराज उगले,प्रल्हादभाऊ रिंधे,गुलाब उगले, महेश खराडे,महेश उगले,रामराव ताके,गजानन देशमुख, देविदास कपिले,अर्जुन कपिले,अंबादास कपिले,शिवाजी कपिले,नेवासा वकील संघाचे अध्यक्ष ॲड.अजय रिंधे,सर्जेराव पंडित,दत्तूभाऊ ताके, दत्तात्रय शिंदे, विठ्ठल जावळे,दत्तात्रय तांबे,अशोक खराडे,पांडुरंग देशमुख,बाळासाहेब रिंधे, संभाजी खराडे,प्रकाश उगले, उद्धव रिंधे,कैलास म्हस्के,कैलास शिंदे,चंद्रकांत तांबे, गणू काका शेटे,अरुण शिंदे,परमेश्वर उगले,प्रकाश बडे, प्राचार्य म्हस्के सर,प्राचार्य खराडे सर,रामा कराळे आदिनाथ उगले राम वाघ,अजित शिंदे,भाऊ गवारे, उस्मानभाई, अब्दुलभाई, मोहम्मदभाई, निसारभाई, अमीन भाई, यासीनभाई, ईसुफभाई, गणीभाई, जाफरभाई अमजद भाई,कलीम भाई, मिनाज इकबाल, समीर भाई, रशीद जमादार, कलंदर भाई, इकबालभाई, अजहर भाई, राजुभाई आदी उपस्थित होते. यावेळी भाविकांसह शाळेतील शिक्षक वृंद, विद्यार्थी यांना पण फराळाचं वाटप करण्यात आले.व सर्व मुस्लिम बांधवांनी सर्व ग्रामस्थांचे आभार मानले.

नेवासा तालुक्यात सौंदाळा येथे जसे सरपंच शरद आरगडे यांच्या नेतृत्वाखाली जातमुक्त गाव घोषित करून जातीचे निर्मूलन करण्याचा निर्धार करण्यात आला तसाच पायंडा पाडण्याचा अभिनव उपक्रम जेऊर हैबती गावाने राबविल्याबद्दल येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे तालुक्यातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# शेती साठी दिवसा वीजपुरवठा न केल्यास आंदोलन : सांबारे

**पुणतांबा** : परिसरात शेतीसाठी दिवसा किमान १० तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा न केल्यास परिसरातील शेतकरी वर्गाच्या वतीने धडक आंदोलन करण्यात येईल असा इशारा येथील दादा सांबारे व संदीप गुंजाळ यांनी दिला आहे.

परिसरात गेल्या १ महिन्या पूर्वी भार नियमनाचे काही तास वगळता दिवसा शेतीसाठी वीजपुरवठा केला जात होता. मात्र अचानक येथील वीज वितरण कंपनी च्या अधिकाऱ्यांनी शेतकरी वर्गाला विश्वा सात न घेता वीज पुरवठा करण्याचे वेळापत्रक बदलले त्यामुळे शेतकरी वर्ग त्रस्त झाले आहेत.

त्यातच परिसरात सध्या बिबट्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अंधार पडल्या नंतर शेतात जाणे अत्यंत अवघड झाले आहे. त्यामुळे दिवसा वीज पुरवठा करणे गरजेचे आहे ह्या प्रश्नाची दखल न घेतल्यास आंदोलना शिवाय पर्याय नसल्याचेही सांबारे व गुंजाळ यांनी स्पष्ट केले आहे.

# अल्पवयीन कॉलेज तरुणीचे अपहरण, गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कॉलेजला जाते असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या अल्पवयीन कॉलेज तरुणीचे अपहरण करून पळवून नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील कानडगांव येथे सकाळच्या सुमारास घडली.

अल्पवयीन मुलगी (वय १५ वर्षे ९ महिने) कानडगांव परिसरात राहत असून ती ११ वीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजे दरम्यान सात्रळ येथे कॉलेजला जाते असे सांगुन घरातून गेली होती. ११.३० वाजे दरम्यान कॉलेजमधील शिक्षकांनी तूमची मुलगी कॉलेजला आली नाही, असे पिडीत तरुणीच्या घरी फोन करून सांगीतले. त्यावेळी तरुणीच्या नातेवाईकांनी तीचा परिसरात व आजू बाजूला शोध घेतला मात्र ती मिळुन आली नाही. दरम्यान तरुणीच्या एका मैत्रीणीच्या आईला पिडीत तरुणीने मोबाईलवर फोन करुन मी लोणी येथे आहे, असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर तरुणीच्या नातेवाईकांनी फोन आलेल्या नंबर तपासला असता तो मोबाईल नंबर मुक्तार हैदर पठाण याचा असल्याचे समजले. तेव्हा नातेवाईकांनी मुक्तार पठाण याच्या घरी जाऊन चौकशी केली असता तो घरी नसल्याचे त्याच्या आई वडीलांनी सांगितले. तेव्हा पिडीत कॉलेज तरुणीला मुक्तार हैदर पठाण यानेच अज्ञात कारणासाठी फुस लावुन पळवून नेले. अशी तरुणीच्या नातेवाईकांची खात्री झाली.

त्यानंतर पिडीत तरुणीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी मुक्तार हैदर पठाण, रा. कानडगांव, ता. राहुरी याच्यावर अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# धमकी देत तरुणीचा विनयभंग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तुझे लग्न झाले तर फक्त माझ्याशीच होईल; तुझ्या आयुष्यात दुसरे कोणी आले तर मी त्याला मारून टाकेन, अशी धमकी देत एका कॉलेज तरुणीशी झटापट करून मारहाण व विनयभंग केल्याची घटना राहुरी तालुक्यातील कणगर परिसरात १४ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, २० वर्षीय पीडित तरुणी राहुरी तालुक्यातील पश्चिम भागातील एका गावची रहिवासी असून ती गणेगाव येथील महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. बारावीमध्ये असताना तिची आरोपीशी ओळख झाली होती. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास तरुणी महाविद्यालयातून आपल्या दुचाकीवरून घरी जात होती. तिच्यासोबत महाविद्यालयातील एक मित्रही स्वतंत्र दुचाकीवर होता. कणगर गावातील कणकावती देवी मंदिराजवळ मागून पल्सर दुचाकीवर आलेल्या आरोपीने तरुणीला अडवून तिच्या गाडीची चावी काढून घेतली. तुझ्या मागे चाललेला हा कोण? तू याच्या सोबत कशी? असा जाब विचारत तुझे लग्न फक्त माझ्याशीच होईल, अन्यथा परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिली. यानंतर आरोपीने तरुणीशी झटापट करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तरुणीच्या मित्राने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्यालाही धमकावत, तुझा काही संबंध नाही, मी कोणाचाही जीव घेऊ शकतो, असे म्हणत दहशत निर्माण केली. त्यानंतर तरुणीने कसाबसा चावी परत घेत पुढे प्रस्थान केले. मात्र काही अंतरावर आरोपी पुन्हा तिच्या मागे जाऊन तिला थांबवले आणि तिचा हात धरून लज्जास्पद वर्तन केले. तरुणीने आरडाओरडा करताच आरोपी तेथून पळून गेला. घटनेनंतर पीडित तरुणीने राहुरी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

# शॉपिंग कॉम्प्लेक्स विनापरवानगी भुईसपाट !

## नवीन कॉम्प्लेक्स बांधून व्यवसायिकांना संधी द्यावी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : येथील ग्रामपंचायत मालकीचे शॉपिंग कॉम्प्लेक्स दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पाडण्यात आले. सदर इमारत ही जिल्हा परिषदेच्या ग्राम सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत सन १९९४-१९९५ मध्ये बांधण्यात आलेली असल्याची माहिती आहे.

सदर सार्वजनिक मालमत्ता पाडताना आवश्यक असलेला ग्रामसभा ठराव घेण्यात आलेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित विभागाची पूर्वपरवानगी व तांत्रिक मान्यता व निर्लेखन न करता ग्राम विकास अधिकारी यांनी बेकायदेशीरपणे मनमानी कारभार करत शॉपिंग कॉम्प्लेक्स भुईसपाट करण्यात आले आहे. दरम्यान, गावांमधील अनेक बेरोजगार तरुणांनी आमच्याकडे व्यवसायासाठी गाळा मिळण्यासाठी मागणी करत आहे या अनुषंगाने आम्ही ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचायत मध्ये प्रशासक नसताना मासिक मीटिंगमध्ये या जागेमध्ये दोन मजली कॉम्प्लेक्स बांधावे व रोजगाराची समस्या निर्माण झाली असल्यामुळे तरुण व्यावसायिकांना गाळे उपलब्ध करून देण्यात यावे अशी सूचना ग्रामपंचायत सदस्यांनी ग्राम विकास अधिकारी यांना केली होती त्यावेळेस ग्राम विकास अधिकारी यांनी या गाळ्यांचे निर्ले खन करणे गरजेचे असल्याचे सांगितले होते. परंतु ९ फेब्रुवारी २०२६ लोकनियुक्त सदस्य व सरपंच यांचा कार्यकाळ सपंताच ग्राम विकास अधिकारी यांनी हा प्रकार केला आहे. याची तक्रार विभागीय आयुक्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे केली आहे त्यावर कारवाई होईलच परंतु आता पाडलेल्या गाळ्यांच्या जागेवर खाली पाच व वरती पाच असे एकूण १० गाळ्यांचे नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्यात यावे व गावातील गरजू नागरिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर याच्या कडे सुनील गंगाधर पटारे मा. ग्रामपंचायत सदस्य (रा. कारेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांनी केली आहे.

# लग्न समारंभात चोरी गेलेले दागिने नमदाम्पत्याला परत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : हळदी समारंभातून चोरीस गेलेले सुमारे सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अवघ्या काही दिवसांत शोधून काढत राहुरी पोलीस स्टेशन यांनी कर्तबगारीचे दर्शन घडविले. न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त केलेले दागिने नवदांपत्यास सुपूर्द करण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद झळकला. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सौ. शैला भास्कर सोनवणे (वय ६१, रा. भवानी चौक, पेठ, जि. नाशिक) या नातेवाईकांच्या लग्नासाठी राहुरी येथे आल्या होत्या. विठ्ठला लॉन्स येथे आयोजित हळदी समारंभादरम्यान त्यांच्या ताब्यात नवरी मुलीचे सुमारे साडेपाच ते सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने ठेवण्यात आले होते. समारंभाच्या



गडबडीत अज्ञात चोरट्याने हे दागिने लंपास केले. या प्रकरणी फिर्यादीवरून राहुरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११९४/२०२५, बीएनएस कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रारंभी कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने तपासास अडचणी येत होत्या. मात्र पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व लग्न समारंभातील छायाचित्रांची बारकाईने तपासणी करत तांत्रिक विश्लेषण केले. तपासादरम्यान अशा प्रकारचे गुन्हे मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील पचोर तालुक्यातील कडिया साँसी गावातील काही लोकांकडून देशभरात केल्याची माहिती समोर आली. मिळालेल्या छायाचित्रांच्या आधारे बोडा पोलीस स्टेशन, मध्य प्रदेश येथे संपर्क साधला असता क्रिश सिकंदर सिसोदिया याचे नाव निष्पन्न झाले. स्थानिक पातळीवर छापा टाकताना गावकऱ्यांकडून पोलिसांवर हल्ल्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्याने स्थानिक पोलिसांच्या मदतीने मोठ्या फौजफाट्यासह नियोजनबद्ध कारवाई करण्यात आली. दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी आरोपीकडून चोरीस गेलेले सुमारे सहा लाख रुपये किमतीचे सोने जप्त करण्यात आले. तपास पूर्ण करून दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त केलेले दागिने संबंधित फिर्यादी व नवदांपत्यास परत करण्यात आले. यावेळी नवदांपत्य व त्यांच्या कुटुंबीयांनी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व तपास पथकाचे आभार मानले. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. तपास पथकात सपोनि सुदाम शिरसाट, सफौ तुळशीराम गिते, सफौ काळे, पोहेकॉ सूरज गायकवाड, पोहेकॉ सतीश आवारे, पोना अशोक कुदळे, पोकॉ प्रमोद ढाकणे, सतीश कुराडे, नदीम शेख, जयदीप बडे, योगेश आव्हाड आदींचा समावेश होता.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# प्रवरेच्या मेकॅनिकलची 'गो-कार्ट' राष्ट्रीय स्पर्धेत धावणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालय येथील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ या संकल्पनेवर आधारित कमी खर्चातील 'गो-कार्ट' वाहनाची निर्मिती केली असून हे वाहन आता राष्ट्रीय स्तरावरील मोटर स्पोर्ट्स स्पर्धेत सहभागी होणार आहे.

कोयंबतूर (तामिळनाडू) येथे खपवळरप डेलळशीं ष छशु एपसळपशशीं यांच्या वतीने आयोजित स्पर्धेसाठी महाविद्यालयाची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.



प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे प्रवृत्त करण्यासाठी विविध उपक्रम राबवत असून त्यातूनच या प्रकल्पाला चालना मिळाली. २४ विद्यार्थ्यांच्या संघाने गेल्या काही महिन्यांपासून गो-कार्टची संकल्पना, डिझाईन, निर्मिती व चाचण्या यासाठी सातत्याने परिश्रम घेतले. कमी खर्चात, पुनर्वापरयोग्य साहित्य वापरून तयार करण्यात आलेल्या या वाहनाचे प्रात्यक्षिक यशस्वी झाले आहे.प्रकल्प समन्वयक डॉ. पी. डी. काबुडके यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले, तर विभागप्रमुख डॉ. मिलिंद म्हस्के यांनी आवश्यक सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. संघाचे नेतृत्व कॅप्टन साईनाथ ढगे व उपकॅप्टन कुणाल गाडेकर करत आहेत. वर्कशॉपमधील सहकारी स्टाफ तसेच प्रदीप वाळुंज, गौरव गोरे व राजू तांबे यांनी तांत्रिक सहाय्य केले.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते गो-कार्टचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## द•ख•ल

## 'लक्षवेध' प्रज्ञाशोध परीक्षेचा 'ज्ञानोत्सव' साजरा



**श्रीरामपूर** : ज्ञानाची कास धरत स्पर्धेच्या दिशेने आत्मविश्वासाने पावले टाकणाऱ्या विद्यार्थ्यांनी रविवारी (दि. १५) श्रीरामपूरात 'लक्षवेध' राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उत्स्फूर्त सहभाने बुद्धिमत्तेचा एक सुंदर सोहळा रंगला. या परीक्षेत इयत्ता पहिली ते आठवीच्या तब्बल १२४० विद्यार्थ्यांनी आपली बौद्धिक क्षमता आजमावली. शहरातील दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा, स्व.एस. के.सोमैया प्राथमिक विद्या मंदिर तसेच वैजापूर तालुक्यातील जि. प. प्राथ. शाळा, अव्वलगाव केंद्रांवर सकाळ व दुपार सत्रांत परीक्षा शांत वातावरणात पार पडली. प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ तसेच गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा शुभेच्छा दिल्या.लक्षवेध फाउंडेशनचे विभागीय व्यवस्थापक गणेश पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेचे नियोजन करण्यात आले होते. केंद्र प्रमुख म्हणून रमेश धोंडलकर, माकोने आणि सुजित बनकर यांनी जबाबदारी सांभाळली.

## कानोरी येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा



**गणोरे** – आपल्या झोपडीचा बंगला करावयाचा असेल तर शिक्षण महत्त्वाचे आहे. आपल्या जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अभ्यास आणि अभ्यासच करा. आपण पहिली ते नववी पर्यंत वर्षाला चार या प्रमाणे छत्तीस परिक्षा दिल्या आहेत. अशा आपण ३६ परीक्षा दिल्या आहेत. न घाबरता आत्मविश्वासाने परिक्षेला सामोरे जा. एकच मिशन अभ्यास अभ्यास आणि अभ्यास असे मत ज्येष्ठ विचारवंत संजय गोर्डे यांनी व्यक्त केली.गणोरे येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून गोर्डे बोलत होते. प्रास्ताविक कडलक एम जी यांनी केले यावेळी अध्यक्षस्थानी विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष लालुशेठ दळवी होते. राजेश्वरी खतोडे व संघमित्रा आहेर या विद्यार्थिनींनी आपले भावनिक मनोगत व्यक्त केले. या वेळी स्कूल कमिटीचे अध्यक्ष संत नामदेव आंबरे, अंबादास दातीर पोलीस निरीक्षक विकास काळे, विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष लालू दळवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आयर्न आंबरे व वैष्णवी पोपेरे यांनी केले. शेवटी भांगरे आर. डी. यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## योग वेदांत सेवा समितीच्या वतीने मातृ-पितृ पूजन दिन साजरा

**राहुरी** : आई – वडिलांबद्दल प्रेम आदर व्यक्त करण्यासाठी भागीरथीबाई तनपुरे कन्या प्राथमिक विद्यालय राहुरी येथे श्री योग वेदांत सेवा समिती राहुरी यांच्या वतीने मातृ पितृ पूजन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मुलाने आपल्या आई-वडिलांचे तिलक लावून हार पुष्प अर्पण करून पूजन केले. मुलांना पाश्चात्य संस्कृती पासून दूर ठेवणे,आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे व आपल्या आई-वडिलांचा आदर करणे करिता श्री योग वेदांत समितीकडून सोमवारी मातृ-पितृ पूजन करण्यात आला. या कार्यक्रमास श्री योग वेदांत सेवा समितीचे सदस्य संदीप चोथे , सत्यवान देशमुख तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका राहींज-धरम तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले मोलाचे सहकार्य केले.

## तायक्वांदो स्पर्धेत पीव्हीपी सैनिक स्कूलच्या खेळाडूंची यश

**लोणी** : जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील सैनिक स्कूल, लोणीच्या १२ कॅडेट्सनी उल्लेखनीय यश संपादन करत केले अशी माहिती शाळेचे प्राचार्य राजेश माघाडे यांनी दिली. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर कॅडेट्सनी विविध गटांमध्ये एकूण १२ पदके पटकावली. यामध्ये स्वराज जाधव, रुद्रप्रताप जाधव, प्रणव पाटील, वेद मिरजकर, ललित कोठुळे, सर्वेश शेलार यांनी सुवर्णपदक तर शुभ हारदे, सुचित बम्मन, संचीत पगार यांनी रौप्यपदक तर देवेश लट्ठे, अथर्व देवरे, अथांश काळे यांनी कास्यपदक मिळविले. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणारे क्रीडाशिक्षक श्री.दिनेश राजपूत आणि प्रशांत देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.शाळेच्या व्यवस्थापन समितीने सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

# नांदूर येथे बिबट्या पिंजऱ्यात अडकला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर** : राहाता तालुक्यातील नांदूर येथील राजेंद्र गलांडे यांच्या शेतात बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याने परिसरातील नागरिकांनी व गावकऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला. संध्याकाळी सहा वाजता बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त होत आहे.

सदर परिसरात अजूनही चार ते पाच बिबटे असण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तवली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. मागील काही दिवसांपासून शेतकरी व ग्रामस्थांना बिबट्याच्या हालचाली जाणवत होत्या. याबाबत वनविभागाला माहिती दिल्यानंतर योग्य ठिकाणी पिंजरा लावण्यात आला होता.आज सकाळी बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे निदर्शनास येताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याची प्रकृती तपासून त्याला



राहुरी येथे पाठविण्यात आले.

वनविभागाच्या तत्परतेचे व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

परिसरातील बिबट्याच्या दहशतीमुळे मजूर कामाला धजत नाही. परिणामी शेतकऱ्यांना मशागतीची अडचण येत आहे. तर शेती पिकाला पाणी देण्यासाठी रात्रीची लाईट असल्याने पिकाला पाणी देणेदेखील कठीण झाले आहे. म्हणून दिवसा वीज पुरवठा मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना विनंती केली आहे.सदरची कारवाई ही महेबुब शेख वनपरिक्षेत्र अधिकारी कोपरगाव यांच्या मार्गदर्शनाखाली सविता थोरात वनरक्षक अधिकारी वाकडी, प्रतीक गजेवार वनरक्षक लोणी, प्राणी मित्र मजाबापू खेमनर यांनी पार पाडली. तर सदर कारवाईस राजेंद्र गलांडे, विशाल गोरे, संजय गलांडे, सुदर्शन पारखे, विठ्ठल जगताप, संतोष ढोकचौळे, राहुल आदक आदींचे सहकार्य लाभले.रात्री बिबट्याच्या दहशतीमुळे शेतीला पाणी देण्यासाठी अडचणी येत आहे म्हणून दिवसा वीज पुरवठा करावा. सोबतच पिंजऱ्यांची संख्या वाढवून मिळावी अशी विनंती परिसरातील नागरिकांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्याकडे केली आहे.

## डॉ. विखे तंत्रनिकेतनमध्ये सहा दिवसीय राज्यस्तरीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनियरिंग (पॉलिटेक्निक) मेकॅनिकल अभियांत्रिकी व ऑटोमोबाईल अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला अँडव्हान्सेस इन इलेक्ट्रिक व्हेइकल फॉर अ सस्टेनेबल फ्युचर या विषयावरील सहा दिवसीय राज्यस्तरीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम नुकताच यशस्वीरीत्या पार पडला अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. राठी यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखालीया प्रशिक्षण कार्यक्रमात राज्यभरातील विविध तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयांतील एकुण तिनशे हुन अधिक प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानातील नव्या घडामोडी, बॅटरी व्यवस्थापन प्रणाली, शाश्वत ऊर्जा स्रोत तसेच भविष्यातील संधी या विषयांवर औद्योगिक व शिक्षण क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. समारोप सत्रात सहभागी प्राध्यापकांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांमुळे अध्यापनाची गुणवत्ता वाढण्यास मोठी मदत होते, असे मत व्यक्त प्राचार्य डॉ. व्ही. राठी यांनी केले. मेकॅनिकल अभियांत्रिकीचे विभागप्रमुख राजेंद्र बेलकर, ऑटोमोबाईल अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. राहुल नरवडे,प्रा. विशाल लवांडे आदींचे मार्गदर्शन लाभले तर समन्वयक म्हणून प्रा. सागर वाल्हेकर आणि प्रा. अजित जपे यांनी काम पाहिले.

# व्यवसाय कर रद्द करा ; श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशनची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र शासनाकडून व्यापारी व व्यावसायिकांकडून आकारण्यात येणारा व्यवसाय कर (प्रोफेशन टॅक्स) तातडीने रद्द करावा, अशी मागणी श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशनने केली आहे. यासंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आल्याची माहिती असोसिएशनचे सचिव संजय कासलीवाल यांनी दिली.

राज्यात पुरुष कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा ७५०० रुपयांवरील पगारावर १७५ रुपये व्यवसाय कर कपात केला जातो, तर महिला कर्मचाऱ्यांसाठी २५०० रुपयांवरील वेतनावर कर आकारला जातो. तसेच मालकी हक्काच्या व भागीदारी फर्म तसेच प्रत्येक भागीदारावरही व्यवसाय कर भरण्याची सक्ती आहे. स्वयंरोजगारातून इतरांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या व्यावसायिकांवर हा कर अन्यायकारक असल्याचे असोसिएशनचे मत आहे.

यापूर्वी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत व्यवसाय कर रद्द करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली होती. कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा तसेच अर्थ विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मात्र अद्याप निर्णय जाहीर झालेला नाही.अर्थसंकल्पीय अधिवेशनात कर रद्द करण्याची घोषणा करावी, अशी मागणी अध्यक्ष राहुल कोठारी, उपाध्यक्ष अनिल लुल्ला यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केली आहे.निवेदन असोसिएशनचे अध्यक्ष राहुल कोठारी, उपाध्यक्ष अनिल लुल्ला, सेक्रेटरी संजय कासलीवाल, सेक्रेटरी नंदलाल कोठारी व संचालक पुरूषोत्तम झंवर, बाळासाहेब खाबिया, प्रविण गुलाटी, गौतम उपाध्ये, निलेश बोरावके, निलेश नागले, धर्मेश शाह, स्वप्निल चोरडीया, योगेश ओझा, संदीप अग्रवाल, दत्तात्रय धालपे यांच्या स्वाक्षरीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आदींना पाठविण्यात आले आहे.

## महात्मा फुले पुतळ्याच्या विटंबनेचा तीव्र निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लारपूर येथे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याची काही समाजकंटकांनी तोडफोड करून विटंबना केली.

या घटनेचे पडसाद राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथे उमटले असून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद दाढ बुद्रुक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच व दाढ बुद्रुक व समस्त ग्रामस्थांच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

देशातील अस्पृश्यता, सतीप्रथा आणि जाती भेदाविरुद्ध लढा देऊन बहुजन समाज, महिला व शेतकऱ्यांना शिक्षणाची दारे उघडणाऱ्या महापुरुषाच्या




पुतळ्यावर झालेला हा हल्ला अत्यंत खेदजनक आणि गंभीर स्वरूपाचा आहे. हा केवळ एका पुतळ्यावर झालेला हल्ला नसून तो सामाजिक समता आणि मानवतावादी विचारांवर झालेला आघात आहे. या घटनेमुळे संपूर्ण देशातील महात्मा फुले प्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या असून तेलंगणा सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

या निषेध आंदोलनात कानिफनाथ तांबे, योगेश सातपुते, रशीद पठाण, तबाजी गाडेकर, बाळासाहेब साळवे, जॉन पाळंदे, बाळासाहेब पाळंदे, पोपट गाडेकर, राजेंद्र मोरे, महेश टपळे, थॉमस भोसले, मल्हारी शिंदे, बाळासाहेब गाडेकर, कपिल दातीर, राधाकिसन गाडेकर व दाढ बुद्रुक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शेतकरी महिलांनी प्रक्रिया उद्योगाकडे वळावे : प्रा.विशाखा देवकर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : शेतकरी महिलांनी उत्पादित मालावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. निरोगी आरोग्यासाठी सेंद्रिय परस्पर ही काळाची गरज आहे आणि या दृष्टीने परसबागेचे महत्त्व महिलांनी समजून घेऊन त्याचा अवलंब करतानाच आपल्या आरोग्याची काळजी घेऊन शेती उत्पादनातून प्रक्रिया उद्योग सुरू करावेत असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाच्या प्रा. विशाखा देवकर यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या लोणी येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने पिंपरी निर्मळ येथे महिलांसाठी परसबाग व्यवस्थापन, फळे आणि भाजीपाला प्रकिया या विषयावर शेतकरी चर्चासत्र त्या बोलत होत्या.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या प्रेरणेने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, कृषी संचालक डॉ.उत्तमराव कदम, प्रा. दिलीप महाले यांच्या मार्गदर्शनाखाली सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.प्रा.देवकर यांनी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या संकल्पनेतून बचत गटाच्या चळवळीला मोठे प्रोत्साहन दिले जाते. शेतकरी महिलांनी केवळ बचत गटाच्या माध्यमातून सक्षम होऊन शेती उत्पादनावर विविध प्रक्रिया करून उद्योजक व्हावेत यासाठी जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न केले जातात. काळात त्यांच्या संकल्पनेतून नक्षत्र परसबाग हा उपक्रम बचत गटाच्या माध्यमातून राबवण्यात आला या माध्यमातून निरोगी आहार ही संकल्पना सौ विखे यांची होती. यावेळी देवकर यांनी परसबाग व्यवस्थापन, फळ प्रक्रिया आणि त्यापासून विविध पदार्थ निर्मिती यावरती महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेद्वारे महिलांना गृह उद्योग कसे करावेत याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी केले. सदर चर्चासत्रास मौजे पिंपरी निर्मळ च्या सरपंच पूनम कांबळे, ग्रामसेवक रमेश भालेराव, ग्रामपंचायत सदस्य अशोक घोरपडे, दिपक निर्मळ, सहाय्यक कृषी अधिकारी जया निमसे, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका गडाख, बचत गटाच्या अध्यक्षा अरुणा निर्मळ, जयश्री निर्मळ, लता निर्मळ, सायली निर्मळ आदी उपस्थित होत्या. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव ,कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप, कार्यक्रम अधिकारी प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीकन्या पुनम मोटे, निकिता चिंधे, रेवती पगारे, पुजा जेजुरकर यांनी प्रयत्न केले.

## देवस्थान कर्मचाऱ्यांचा साखळी उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थान प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांचे रखडलेले वेतन, दिवाळी बोनस तसेच इतर आर्थिक प्रश्न प्रलंबित असल्याने २ मार्चपासून साखळी उपोषण करण्याचा इशारा कामगार संघटनेने दिला आहे. याबाबतचे निवेदन देवस्थान प्रशासनाला देण्यात आले असल्याची माहिती कामगार संघटनेचे अध्यक्ष श्यामसुंदर शिंदे यांनी दिली.डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ या महिन्यांचे वेतन अद्याप न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. भविष्य निर्वाह निधी, आयुर्विमा, कामगार सोसायटी कर्ज कपात आदी बाबींवर व्याजाचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून कर्मचाऱ्यांवर मानसिक ताण वाढला आहे, असे संघटनेचे म्हणणे आहे. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी कागदपत्रांची तपशीलवार पडताळणी सुरू असल्याने वेतन लवकरच अदा केले जाईल, असे स्पष्ट केले आहे.भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी देवस्थानचे नियमित कामकाज सुरू ठेवत संघटनेतील पाच कर्मचारी सदस्य बेमुदत उपोषणास बसणार असल्याचे सांगण्यात आले.

# नफा-तोट्याच्या गणितातून जीवनकौशल्यांची जडणघडण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील दिघेवस्ती (धानोरे) येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'बाल आनंद मेळावा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आयोजित या मेळाव्यात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध विक्री स्टॉल्स उभारून शिक्षणासोबत व्यवहारज्ञानाची प्रभावी सांगड घातली.

मेळाव्याच्या निमित्ताने शाळेचा परिसर सकाळपासूनच गजबजून गेला होता. विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने गट तयार करून फळे, भाज्या, तृणधान्ये, शालेय साहित्य, किराणा वस्तू तसेच फुलांच्या गजऱ्यांचे स्टॉल्स लावले. वस्तूंची आकर्षक मांडणी, किंमतपत्रके आणि स्वतंत्र हिशोब वही



यामुळे प्रत्येक स्टॉल व्यवस्थितपणे सज्ज दिसत होता. ग्राहकांशी नम्र संवाद साधत विद्यार्थ्यांनी पैसे स्वीकारणे व सुट्टे पैसे परत देणे अशा व्यवहारांची जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

मेळाव्यातील खाऊगल्ली विशेष आकर्षण ठरली. पाणीपुरी, अप्पे, पॅटीस, इडली-सांबार, डोसा, कच्छी दाबेली, वडापाव, भजी, चना, ओली भेळ, सरबत, गुलाबजाम, बदाम शेक, मठ्ठा व चहा या पदार्थांना ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना नफा-तोटा, पैशांचे नियोजन, संवादकौशल्य, संघभावना आणि आत्मविश्वास यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. प्रत्येक गटाने दिवसअखेरीस आपला लेखाजोखा सादर केला. गणिताचा दैनंदिन जीवनातील उपयोग विद्यार्थ्यांना या माध्यमातून समजला.शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद आणि पालकांच्या सहकार्यामुळे मेळावा यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण करणारा हा उपक्रम ग्रामीण शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरला असून पंचक्रोशीत त्याची चर्चा रंगली आहे.

## जाहीर समन्स

(दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑ. ५ रुल २०(१-ए) प्रमाणे)
राहुरी येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर)
**(मा.श्री. आदित्य शिंदे साहेब) यांचे कोर्टात..**

रे.मु.नं. १६४/२०२५

**वादी** – श्रीमती मायावती मधुकर जोशी
रा.सुर्यानगर, चिंचविहिरे, ता. राहुरी, जि. अहमदनगर

**प्रतिवादी**– १) श्रीमती सरीता अतुल जोशी
२) कु. रेणुका अतुल जोशी
३) कु. रोहित अतुल जोशी
प्र.वा.नं. २ व ३ ची अ.पा.क.आई
प्रतिवादी नं. १ सर्व रा. सुर्यानगर, चिंचविहिरे, ता. राहुरी, जि. अहमदनगर

प्रतिवादी नं. १ ते ३ यांना या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी वादी श्रीमती मायावती मधुकर जोशी यांनी नंबर मजकुरचा दावा तुमच्या विरुध्द वाटप, कब्जासाठी दाखल केलेला आहे. त्याअर्थी नंबर मजकुरच्या दाव्याचे समन्स घेणेसाठी अथवा ते डकवून बजावण्यासाठी तुम्ही जाणीवपूर्वक कोर्ट बेलिफ यांना नकार दिलेला आहे. त्यामुळे या जाहीर समन्सद्वारे तुम्हांला कळविण्यात येते की, दि. ०२/०४/२०२६ रोजी तुम्ही समक्ष अथवा तुमच्या वकिलांद्वारे मे. कोर्टामध्ये जातीने हजर रहावे, आपण मे. कोर्टामध्ये हजर राहणेसाठी हयगय अथवा टाळाटाळ केल्यास आपले काहीही एक म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्ट तुमचे विरुध्द एकतर्फी पुढील आदेश करतील, त्यावेळी होणाऱ्या कायदेशीर परिणामांची सर्वस्वी जबाबदारी तुमचीच राहील, याची तुम्ही नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स असे.

स्थळ- राहुरी
दिनांक १४/०२/२०२६
(शिक्का)
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय, राहुरी,जि.अहमदनगर**

**हुकुमावरुन..**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, राहुरी जि. अहमदनगर**

## पान १ वरुन

### राज्यात ११ नवे अतिरिक्त जिल्हाधिकारी

होते. त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी बंदोबस्त देण्याच्या सूचना केल्या. शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच भिंगार कॅम्पचे सहायक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी संबंधित भागात उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. तथापि, एटीएसच्या अंतर्गत तपासात स्थानिक पोलिसांना सहभागी करून घेण्यात आले नव्हते. त्यांच्या भूमिकेपुरते बंदोबस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम मर्यादित ठेवण्यात आले.सूत्रांच्या माहितीनुसार, प्राथमिक चौकशीत काही धागेदोरे हाती लागले असून त्यावर आधारित पुढील टप्प्यात व्यापक कारवाई होण्याची शयता नाकारता येत नाही. अहिल्यानगरमध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर एटीएसची कारवाई झाल्याने शहरात दिवसभर चर्चांना उधाण आले होते.

### हर्षवर्धन सपकाळ नरमले!

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, 'शिवप्रेमी बंधू-भगिनींनो, सप्रेम नमस्कार! सरकारी कार्यालयांमध्ये विविध महापुरुषांचे फोटो एकत्र लावल्याने समाजात तेढ निर्माण होणार नाही, तर ऐक्याचा संदेश जावा, या आशयाचे माझे ७० सेकंदांचे वक्तव्य होते. दुर्दैवाने, त्या विधानातील एका शब्दाचा संदर्भ तोडून जाणीवपूर्वक विपर्यास करण्यात आला. सोशल मीडियावर दिशाभूल करणाऱ्या मोहिमा चालवून मी जे बोललोच नाही ते माझ्या तोंडी घालण्यात आले आणि छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना केली, असा चुकीचा समज निर्माण करण्यात आला. भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या पिलावळीकडून हा अपप्रचार नियोजनपूर्वक पसरवण्यात आला. त्याआधारे राज्यात धार्मिक तेढ निर्माण करून दंगली घडवण्याचा प्रयत्न झाला हे आपण पुण्यात पाहिले आहे.'
'मी पुन्हा एकदा स्पष्ट आणि ठामपणे सांगतो, छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. ते माझे आदर्श, प्रेरणास्थान आणि स्वाभिमान आहेत. त्यांच्या तुलनेचा प्रश्नच उद्भवत नाही. टिपू सुलतानांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इंग्रजाविरूद्ध लढा दिल्याचे मी म्हटले होते. त्यांच्या योगदानाची दखल घेत थेट भारताच्या संविधानामध्ये देखील त्यांची तसबीर आहे त्यांच्या प्रतिमेच्या संदर्भात समाजात तणाव वाढू नये, सर्वांनी परस्पर सन्मान आणि बंधुभाव जपावा, हा माझ्या वक्तव्याचा गाभा होता. इतिहासावर मतभेद असू शकतात; मात्र त्यावर संयत, अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी आणि समाजात संघर्ष निर्माण होऊ नये, जात-धर्म-पंथावर ध्रुवीकरण अजिबात खपवून घेता कामा नये, हीच भूमिका मी मांडली होती. प्रकरणी भाजपचा तीव्र शब्दात निषेध करतो त्यांच्या गलिच्छ खोडसाळपणामुळे काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या, त्याबद्दल मी मनःपूर्वक खेद व्यक्त करतो. माझ्या शब्दाचा गैरवापर केल्या बद्दल शिवप्रेमींप्रती दिलगिरी व्यक्त करतो. कोणाच्याही भावनांना ठेच पोहोचवण्याचा माझा हेतू नव्हता.'

### जन्मदात्या आईला भिंतीवर आपटले

रहिवाशांनी या घटनेबद्दल तीव्र धक्का व्यक्त केला आहे. बेबी गवारे या शांत स्वभावाच्या असल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. मुलाकडूनच असा प्रकार घडल्याने अनेकांनी हळहळ व्यक्त केली.
या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सुहास गवारे याची चौकशी सुरू आहे. खुनामागील नेमके कारण, आरोपीची मानसिक अवस्था आणि घटनेचा संपूर्ण घटनाक्रम तपासला जात आहे. घरगुती वादातून इतक्या टोकाची हिंसा घडल्याने कौटुंबिक तणाव आणि मानसिक आरोग्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. अशा घटना टाळण्यासाठी सामाजिक स्तरावर समुपदेशन आणि जनजागृतीची गरज अधोरेखित होत आहे.

### वांबोरी घाटात मृतदेह आढळला

मृतदेह ताब्यात घेऊन, शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला आहे. मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाहीये. तो ३५ ते ४० वयोगटातील पुरुष जातीचा मृतदेह आहे. तीन ते चार दिवसांपूर्वी त्याचा खून झाला असावा, अशी शक्यता वर्तवली जाते. मृतदेहाची ओळख पटवून गुन्ह्याचा तपास लावणं, हे पोलिसांसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. या घटनेमुळे वांबोरी आणि नगर परिसराम ध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. डोंगरगण हे ठिकाण निसर्गरम्य असल्यानं, तिथे नेहमीच वर्दळ असते. घाटांमध्ये आजपर्यंत खून, दरोडे, रस्ता लूट अशा अनेक घटना घडल्या आहेत. या भागामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आता बसवण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात केली जात आहे

# नर्मदा परिक्रमा पूर्ण करणाऱ्या अशोक तांबे व वसंत तांबे यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** येथे संत शिरोमणी सावता महाराज व वै. बन्सी महाराज तांबे यांच्या कृपा आशीर्वादाने अशोक मच्छिंद्र तांबे व वसंत तुकाराम तांबे यांनी १०५ दिवसांमध्ये पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल भव्य सजवलेल्या रथांमधून फटाक्याच्या आतषबाजी मध्ये मिरवणूक पार पडली.

यावेळी हभप शिवाजी महाराज तांबे, नवनाथ महाराज तांबे, हभप बाबासाहेब महाराज वांढेकर, बालाजी देवस्थानचे अध्यक्ष नवनाथ महाराज मुंगसे, जनार्धन तांबे, मुरलीधर म्हस्के, संजय महाराज गोंडे, मृदुंगाचार्य कृष्णा महाराज ससे यांच्या उपस्थितीत हरिनामाच्या गजरात टाळ मृदुंगाच्या वाद्यात ही मिरवणूक पार पडली.

या सोहळ्यात ज्येष्ठ नागरिक बाजीराव मुंगसे, माजी सरपंच मच्छिंद्र कदम, मा. चेअरमन कडूभाऊ तांबे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके,सरपंच चंद्रकांत मुंगसे,उपसरपंच आनंद दळवी, मा. उपसरपंच बाळासाहेब मुंगसे,ग्रामपंचायत सदस्य कानिफनाथ गोयकर, अंबादास तांबे, विश्वास हिवाळे, देवस्थानचे विश्वस्त सुभाष मुंगसे, सुनील शेठ मुथा, सोसायटीचे व्हाईस चेअरमन जनार्दन देशमुख,



देविदास रक्ताटे,गणेश औटी, चेअरमन संतोष तांबे, अमोल तांबे, अरुण मुंगसे, शिवाजी काजळे,पत्रकार युनूस पठाण आदी भाविक व महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

# मायलेकाला शिवीगाळ करून मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** काहीएक कारण नसताना आरोपींनी दोघां माय लेकाला शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील गुंजाळे येथे दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

शरद रावसाहेब सरोदे, वय ३८ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. गुंजाळे, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास शरद सरोदे हे गुंजाळे बस स्टॅण्डवर गेले होते. त्यावेळी आरोपीने शरद सरोदे यांना काहीएक कारण नसताना रस्त्यावर खाली पाडुन त्यांच्या मोटार सायकलचे हेल्मेट काढुन मारले. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता शरद सरोदे व त्यांची आई आशाबाई असे त्यांच्या दारात उभे असताना तेथे आरोपी आले आणि शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारहाण केली. तसेच तुम्ही जर आमचे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर तुमचे विरुध्द मी पोलीस स्टेशनला काहीही खोटी तक्रार देईल, अशी धमकी दिली व तेथुन निघुन गेले.

शरद रावसाहेब सरोदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विकास सुधाकर सरोदे व एक अनोळखी इसम, दोघे रा. गुंजाळे, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# खंडाळा येथे बस स्टॅन्ड उभारण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर असलेल्या खंडाळा या मोठ्या गावात एसटी बसस्थानकाची सोय नसल्यामुळे प्रवाशांची खूप गैरसोय होत आहे. विशेषतः उच्च शिक्षणासाठी खंडाळा येथून बाहेरगावी जाणाऱ्या विद्यार्थिनींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असून बसण्यासाठी जागा नसल्याने त्याना दुकानासमोर किंवा इतरत्र आजूबाजूला थांबावे लागत आहे. त्यामुळे खंडाळा येथे शासकीय किंवा गावठाणच्या जागेत एस टी स्टॅन्ड शेड उभरावे अशी मागणी एआयएमआयएम पक्षाचे तरुण सामाजिक कार्यकर्ते नेहाल नबी पटेल यांनी केली आहे. त्यांनी खंडाळा येथे थांबून तेथील प्रवाशी नागरिक वं विद्यार्थिनींच्या समस्या जाणून घेतल्या.

> "खंडाळासारख्या मोठ्या गावात एक चांगले बस स्टॅन्ड नसणे ही विकासाच्या दृष्टीने खूप वाईट बाब आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी मी आक्रमक भूमिका यापुढील काळात घेणार आहे."
> _ नेहाल नबी पटेल

बाहेरगावी जाणाऱ्या विद्यार्थिनींसाठी खंडाळा येथे बस स्टॅन्ड शेड नसल्याने कुठेतरी थांबल्याने या मुलींना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे महिला मुली व प्रवाशी नागरिकांची गैरसोय होत आहे. म्हणून शासनाने त्वरित बस स्टॅन्ड उभारण्याबाबत कार्यवाही कराव. येत्या पंधरा दिवसात शासनाने कुठलेही पाऊल न उचल्यास खंडाळा येथे एआयएमआयएम पक्षातर्फे तसेच सर्व गरजू नागरिकांतर्फे रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नेहाल पटेल यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति राज्याच्या परिवहन मंत्र्यांनाही पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# शिक्षकांच्या देणगीतून साकारले आयसीयू सेंटर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** येथील अल् करम हॉस्पिटल मध्ये जिल्ह्यातील उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या उदार देणगीतून साकारलेल्या पाच बेडच्या माजी उपशिक्षणाधिकारी रमजान पठाण आयसीयू सेंटर चे उद्घाटन बालभारती पुण्याचे उर्दू अधिकारी नवेदुलहक खान यांचे शुभहस्ते संपन्न झाले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते,जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष के के खान,साप्ताहिक मखदूमचे संपादक आबिद खान,प्रसिद्ध सर्जन डॉक्टर रवींद्र कुटे,अब्दुल्ला हसन चौधरी,कवयित्री डॉ.कमर सुरूर, माजी शिक्षण विस्तार अधिकारी अश्फाक शेख,रियाज इनामदार,नर्गिस ईनामदार,फारुक पटेल,बदर शेख, फिरोज पठाण आदि उपस्थित होते. अल करम हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर जहीर मुजावर यांनी प्रास्ताविक भाषणामध्ये हॉस्पिटलच्या सर्व विभागांची माहिती दिली अत्याधुनिक मशनरीने सदरची हॉस्पिटल सुसज्ज असून या ठिकाणी अतिशय कमी दरामध्ये रुग्ण सेवा केली जाते असे त्यांनी सांगितले . प्रसिद्ध सर्जन डॉ.रवींद्र कुटे यांनी हॉस्पिटल मधील सर्व सुविधा पाहिल्यानंतर अत्याधुनिक पद्धतीचे उपचार रुग्णांवर या ठिकाणी केले जातात याबद्दल समाधान व्यक्त केले. उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण यांनी जिल्ह्यातील उर्दू शिक्षकांनी कोरोना काळामध्ये जमा केला होता. माजी उपशिक्षणाधिकारी रमजान पठाण यांच्या संकल्पनेतून हा निधी साकारला. दुर्दैवाने त्यांचे निधन झाल्याने जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी हा निधी सदर हॉस्पिटल मध्ये आयसीयू सेंटरसाठी देण्याचा निर्णय घेतला व जिल्ह्यातील शिक्षकांच्या मागणीनुसार या आयसीसी सेंटरला रमजान पठाण यांचे नाव देण्यात आले असे सांगून सदर हॉस्पिटल मध्ये गोरगरीब रुग्णांना अत्यंत माफक दरामध्ये सेवा उपलब्ध करून दिली जात असल्याने भविष्य काळातही समाजातील दानशूर व्यक्तींकडून हॉस्पिटलला मदत करण्याचे आश्वासन दिले.

## निधन वार्ता

### केशरबाई वाघमारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** शहरातील जेष्ठ महिला केशरबाई रंभाजी वाघमारे (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, पतवंडे व जावई असा परिवार असून त्या स्वस्तधान्य दुकानदार भाऊसाहेब, राजेंद्र व संजय वाघमारे यांच्या मातोश्री होत. जेष्ठ जलतरणपटू स्व. रंभाजी बाबाजी वाघमारे यांच्या त्या पत्नी होत.

### गणपत साळुंके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** येथील पत्रकार शिवाजी साळुंके यांचे वडील गणपत शंकर साळुंके यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षाचे होते. शेतीनिष्ठ शेतकरी ते होते आध्यात्मिक क्षेत्र सह सामाजिक,शेती क्षेत्रात त्यांनी काम केले होते. त्याच्या मागे पत्नी चार मुली एक मुलगा सुना नातवंडे असा परिवार आहे.

# पोहेगावच्या श्री मयुरेश्वर चरणी परदेशी गणेशभक्त लीन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील पोहेगाव येथील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या श्री मयुरेश्वर गणपतीच्या चरणी साता समुद्रा पार असलेले परदेशी गणेश भक्त लीन झाले. शिर्डी येथील साई बाबांचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी फेसबुक इंस्टाग्रामवर पोहेगाव येथील मयुरेश्वर गणपतीची माहिती बघितली होती. त्यांनी तेथील स्थानिकांना याबाबत विचारणा केली . लगेच त्यांच्या विनंतीला मान देत स्थानिक चालकाने त्यांना गणपतीच्या चरणी लीन केले. दर्शनासाठी आल्यानंतर या परदेशी पाहुण्यांनी शिस्तीचे काटेकोरपणे पालन केले. रांगेत दर्शन घेत त्यांनी सर्व भाविकांना शिस्तीचा संदेश दिला. देवस्थानचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे यांच्या वतीने सचिव विनोद रोहमारे, बाबासाहेब रोहमारे, दिपक रोहमारे,संजय वाघ, महेंद्र रोहमारे, भगीरथ रोहमारे यांनी त्यांचे स्वागत केले. श्री मयुरेश्वर गणपतीची दर्शन घेऊन मंदिर परिसरात फेरफटका मारला. शेवटी सर्वांचे आभार बाबासाहेब रोहमारे यांनी मानले.



# शिवना नदीपात्रातुन अवैध वाळु उपसा थांबता थांबेना

**गंगापूर :** तालुक्यातील शंकरपूर वं काटे पिंपळगावसह आदी गावातील शिवना नदीपात्रातुन अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक काही थांबता थांबेना. खनीकर्म अधिकारी व महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून दिवसा ढवळ्या अवैध वाळू उत्खनन सुरूच असून चार दिवसांपूर्वी वाळू माफियांचे दोन गट आमनेसामने येत लाठ्याकाठ्यांनी तुफान हाणामारी झाल्याची घटना देखील घडली. मात्र अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या विरोधात कारवाई होत नसल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसुल चुना लागत असल्याचे पाहायला मिळत आहे. गंगापूर तालुक्यातील शंकरपुरसह, काटे पिंपळगाव आदी गावातील शिवना नदीपात्रातून दिवसा ढवळ्या अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असुन अक्षरशः वाळू माफीयांनी नदीपात्र पोखरून टाकले असतांना खनीकर्म अधिकारी व महसूल प्रशासनाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना अवैध वाळू उत्खनन रोखण्यासाठी वेळ नाही.

# आयआयएफएल फायनान्स बाँडद्वारे २००० कोटी रुपये उभारणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** देशातील आघाडीच्या नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (एनबीएफसी) आयआयएफएल फायनान्स लिमिटेडने ५०० कोटी रुपयांच्या इश्यू आकारासह रिडीमेबल नॉन-कन्व्हर्टेबल डिबेंचर्स (एनसीडी) चा सार्वजनिक इश्यू जारी केला आहे. या एनसीडींना १,५०० कोटी पर्यंतचे ओव्हरसबस्क्रिप्शन राखण्याचा पर्याय आहे, ज्यामुळे इश्यूचा आकार २,००० कोटी होईल. हे एनसीडी विविध गुंतवणूकदार वर्गांना प्रत्येकी १,००० च्या दर्शनी मूल्यावर ऑफर केले जातील.

ज्यासाठी किमान अर्ज आकार १०,००० असेल. सार्वजनिक विक्री १७ फेब्रुवारी २०२६ रोजी उघडेल आणि ४ मार्च २०२६ रोजी बंद होईल, लवकर बंद करण्याचा पर्याय असेल. वाटप प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केले जाईल. कंपनीचा व्यवसाय आणि भांडवल वाढवण्यासाठी निधी उभारला जात आहे.

हे एनसीडी २४ महिने, ३६ महिने आणि ६० महिन्यांच्या गुंतवणूक कालावधीसह वार्षिक ९ टक्यांपर्यंत प्रभावी परतावा देते. गुंतवणूकदार व्याजासाठी मासिक, वार्षिक किंवा मुदतपूर्तीनंतरच्या पेमेंट पर्यायांमधून निवडू शकतात.

## ९ टक्यांपर्यंत वार्षिक परतावा

प्रस्तावित इश्यूमध्ये क्रिसिल रेटिंग्जकडून क्रिसिल एए/स्टेबल रेटिंग आणि ब्रिकवर्क रेटिंग्जकडून बीडब्ल्यूआर एए+ (स्टेबल) रेटिंग देण्यात आले आहे, जे इश्यू खूप कमी क्रेडिट जोखीम असलेले आहेत आणि वेळेवर आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी अत्यंत सुरक्षित आहेत.

आयआयएफएल फायनान्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री निर्मल जैन म्हणाले, "भारतातील आघाडीच्या एनबीएफसींपैकी एक असलेल्या आयआयएफएल फायनान्सची देशात मजबूत उपस्थिती आहे आणि त्यांचा वैविध्यपूर्ण रिटेल पोर्टफोलिओ आहे. ते ४.६ दशलक्षाहून अधिक वंचित ग्राहकांना कर्ज प्रदान करते. या प्रस्तावित निधी संकलनामुळे आम्हाला कर्ज उपलब्धता वाढविण्यास आणि आमच्या निधी स्रोतांमध्ये विविधता आणण्यास मदत होईल. गेल्या काही वर्षांत बाँडद्वारे निधी उभारण्याचा आयआयएफएल फायनान्सचा एक मजबूत ट्रॅक रेकॉर्ड आहे आणि त्यांनी मुद्दल आणि व्याजाची वेळेवर परतफेड केली आहे."३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आयआयएफएल फायनान्सकडे व्यवस्थापनाखालील कर्ज मालमत्ता (एयूएम) ९८,३३६ कोटी होती. कंपनीने अजूनही मजबूत मालमत्ता गुणवत्ता राखली आहे. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत, कंपनीच्या एकत्रित कर्ज पुस्तकाच्या टक्केवारीनुसार एकूण अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) १.६० टक्के आणि निव्वळ एनपीए ०.७५ टक्के होती. याव्यतिरिक्त, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत, तिच्या एकत्रित कर्ज पुस्तकाच्या ८३.६१ टक्के पुरेशा तारणाने सुरक्षित करण्यात आल्या होत्या, ज्यामुळे जोखीम आणखी कमी झाली. आयआयएफएल फायनान्सने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ५०१.३ कोटी करपश्चात नफा (पीएटी) नोंदवला, जो वार्षिक आधारावर ५१४ टक्क्याने वाढला. आर्थिक वर्ष २०२६ च्या नऊ महिन्यांसाठी पीएटी १,१९३.५ कोटी होता, जो वार्षिक आधारावर २६५ टक्के वाढला. कंपनी तिच्या निधी धोरणाला पाठिंबा देण्यासाठी विविध बँका आणि वित्तीय संस्थांशी मजबूत संबंध राखते.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत, कंपनीच्या देशभरात ४,७६१ शाखा होत्या, ज्यामध्ये एकूण ३६,७८६ कर्मचारी कार्यरत होते. या इश्यूचे प्रमुख व्यवस्थापक ट्रस्ट इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड, नुवामा वेल्थ मॅनेजमेंट लिमिटेड आणि आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड आहेत. गुंतवणूकदारांना तरलता प्रदान करण्यासाठी एनसीडी बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियामध्ये सूचीबद्ध केले जातील.

# "हर हर महादेव" च्या गजरात शिवभक्तांनी घेतले सोमेश्वर स्वयंभू शिवलिंग दर्शन

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील करंजे येथील प्रति सोरटी सोमनाथाचे रूप मानले जाणारे श्रीक्षेत्र करंजे येथील श्री सोमेश्वर मंदिर आहे. येथे श्रावण महिना व महाशिवरात्र या दिवशी विविध जिल्ह्यातून शिवभक्तांची स्वयंभू शिवलिंग दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी होत असते . महाशिवरात्रीनिमित्त रविवारी दि. १५ रोजी पहाटेपासूनच शिवभक्तांनी रंगाच्या रंग लावलेल्या होत्या व मंदिर व मंदिर परिसर हर हर महादेव च्या गजराने गजबजून गेला होता.

रविवारी पहाटे बारामतीचे प्रांताधिकारी वैभव नावडकर तसेच तहसीलदार स्वप्निल रावडे यांच्या हस्ते स्वयंभू शिवलिंगाची महापूजा करण्यात आली. या वेळी विश्वस्त समिती अध्यक्ष अनंता मोकाशी, सचिव विपूल भांडवलकर , सर्व विश्वस्त सह ग्रामस्थ व भाविक भक्त उपस्थित होते.

महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ओंकार शिंदे, अविनाश सावंत, हिंमत सोरटे, हेमंत घाडगे, राजेंद्र गाडेकर यांनी दिवसभर महाप्रसादाची आयोजन केले होते. अनेक भाविकांनी सोमेश्वर दर्शनानंतर सती मालुबाई मंदिरात दर्शन घेतले. होळ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि साई सेवा हॉस्पिटल वाघळवाडी यांच्या वतीने भाविकांसाठी मोफत औषधोपचार करण्यात आले. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने गेला आठवडाभर सुरू असलेल्या अतिरुद्र अनुष्ठानाची सांगता महाशिवरात्री दिनी झाली.

सोमेश्वर मंदिर व मंदिर परिसर विविध खेळणी, मिठाई, प्रसाद, पानफुले, पाळणे, हॉटेल आदींच्या दुकानांमुळे सर्व परिसर गजबजून गेलेला होता विशेष रविवारी सुट्टी असल्याने चिमुकल्यांची गर्दी पाहावयास मिळाली कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून वडगाव निंबाळकरचे सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील, उपनिरीक्षक राहुल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## नशिबाची परिक्षा

बुधवार दि . १८ फेब्रुवारी २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत
३९० ४८० २२८ — २-८ — १७० ३५० ८००
जोड: २१-३८-५४-७९-८०

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत
१३८ ३७० ३३४ — ०-२ — १३६ २४६ ६६०
जोड: ०६-४२-१८-३५-२९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत
१२५ २८० ८४० — ८-१ — १३७ ३८० ३३५
जोड: ८०-४१-२५-९७-१६

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# एमआयडीसीत पुढारी व गुंडांची दहशत

## उद्योजकांची पोलिसांकडे धाव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : एमआयडीसीत कथित कामगार संघटनेचे पुढारी व काही अनोळखी गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना सोबत घेऊन कंपनीच्या आवारात अनधिकृत प्रवेश करत असल्याप्रकरणी सुयश मेटल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक व असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) संघटनेच्या सदस्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन दिले. तर औद्योगिक वसाहतीतील दहशत कायमस्वरूपी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, मा. उपाध्यक्ष संजय बंदिष्टी, दिलीप अकोलकर , सह सचिव सतीश गवळी, सचिव प्रफुल्ल पारख, सचिव सुमितलोढा, एमसीसीआयचे अरविंद पारगावकर, निखिल लोढा, दीपक नागरगोजे,मिलिंद दिनकर कुलकर्णी, मिलिंद एकनाथ कुलकर्णी, बालकृष्ण नरोडे, संदीप कोद्रे, राजेंद्र शुक्रे,रिसे साहेब ,प्रमोद भारुळे ,सुहास फुंदे , संदेश पिंपळकर , भूषण भणगे , सुभाष गुगळे , रोहकले साहेब ,दिनेश मुनोत, सुमित सोनवणे निनाद टिपुगडे, गोकुळ हांडे सचिन काकड इत्यादी सह बहुसंख्येने उद्योजक उपस्थित होते. अहिल्यानगर येथील औद्योगिक वसाहतीत अलीकडे वाढत चाललेल्या दहशतीच्या घटनांमुळे उद्योजक व कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

औद्योगिक वसाहत आकाराने लहान असली तरी तीच अहिल्यानगरच्या अर्थव्यवस्थेची मुख्य जीवनरेषा आहे. अनेक लघु उद्योग हे पूर्वाश्रमिच्या कामगारांनी एकत्र येऊन उभारलेले असल्याने उद्योगांवर होणारा कोणताही दबाव हा संपूर्ण आर्थिक व्यवस्थेला धक्का देणारा ठरत आहे. निवेदनानुसार, कथित कामगार संघटनेचे पुढारी व काही अनोळखी गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना सोबत घेऊन कंपनीच्या आवारात अनधिकृत प्रवेश केला. या वेळी कंपनीचे कामकाज बंद पाडण्याचा मानस असल्याचा आरोप करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, तथा कथित व्यक्ती व त्यांच्या साथीदारांनी सुयश मेटल कंपनीच्या मालकांच्या घरी जाऊन मोठ्या प्रमाणावर तोडफोड करून घरातील वस्तूंचे नुकसान केल्याचेही निवेदनात नमूद आहे.

यासंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज व छायाचित्रे पुराव्यासह प्रशासनाकडे देण्यात आली आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेत अशा व्यक्ती व साथीदारांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच औद्योगिक वसाहतीतील दहशत कायमस्वरूपी दूर करण्यासाठी स्थानिक पोलिसांना त्वरित कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी आमी संघटनेतर्फे करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे म्हणाले की, कोणाकडूनही दबाव, धमकी, खंडणी किंवा दहशतीचा प्रकार होत असल्यास उद्योजकांनी घाबरून न जाता तातडीने स्वतःहून तक्रार दाखल करावी. पोलिस प्रशासन पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे आश्वासन दिले.



### पोलीस अधीक्षक घार्गे यांच्याकडून कारवाईचे आश्वासन

या प्रकरणासंदर्भात अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उद्योजकांना आश्वासन देत स्पष्ट केले की, औद्योगिक वसाहतीत दहशत निर्माण करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल. भविष्यात अशा प्रकारचा दबाव, धमकी किंवा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना तात्काळ धडा शिकवला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## द•ख•ल

### आखेगाव संस्थान येथे भव्य भक्ती कुंभाचे आयोजन



**शेवगाव** : श्री संत जोग महाराज संस्कार केंद्र आखेगाव येथे वार्षिक अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त भव्य 'भक्ती कुंभ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. सद्गुरु जोग महाराज, विठ्ठल महाराज घुले, नारायण बाबा झिंजुर्के यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह संपन्न होणार आहे. सप्ताह दरम्यान काकडा भजन, टाळ-मृदंगाच्या गजरात गाथा पारायण, पारंपरिक फड पद्धतीने गाथा भजन, अन्नदान, प्रवचन, हरिपाठ नियमाचे भजन, कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्ती कुंभात ह.भ.प. राजू महाराज काटे यांनी श्रीक्षेत्र आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचा चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून कीर्तन परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल तसेच जगद्गुरु तुकाराम महाराज यांची संपूर्ण अभंग गाथा मुखोद्गत केल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या भक्तीमय सोहळ्यासाठी संस्थानचे भक्तजन तयारीला लागले असून सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सद्गुरु जोग महाराज सेवा संस्थान भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# केडगाव स्वस्त धान्य दुकान प्रकरण तापले

## खोटी माहिती देऊन शासनाची फसवणूक?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : केडगाव येथील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ७२ संदर्भात खोटी माहिती सादर करून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित संस्थेच्या चेअरमनवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस चे शहर संघटक राजेश भालेराव व शहर उपाध्यक्ष राम धोत्रे यांनी केली आहे. सोमवारी (दि. १७) आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत पुरावे सादर केले. लक्ष्मी औद्योगिक संस्थेच्या नावाने चालणारे हे दुकान २०१८ मध्ये अन्नधान्य वितरणातील गंभीर त्रुटींमुळे निलंबित करण्यात आले होते.

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी १६ ऑक्टोबर २०१८ रोजी कारवाई केली होती. या निर्णयाविरोधात उपायुक्त (पुरवठा), नाशिक यांच्याकडे अपील करण्यात आले होते; मात्र ६ फेब्रुवारी २०२५ रोजी ते फेटाळण्यात आले. त्यानंतर संबंधित व्यक्तीने अप्पर सचिव, पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पुन्हा अपील दाखल केले व ते मंजूर झाल्याने दुकान पूर्ववत करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. मात्र २८ मार्च २०२५ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संस्था अवसायनात काढल्याचे पत्र दिले असल्याचे भालेराव यांनी सांगितले.

संस्था अस्तित्वात नसताना चेअरमन म्हणून अपील कसे दाखल झाले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. याप्रकरणी सखोल चौकशी करून फौजदारी कारवाई करावी, अन्यथा आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# सीएसआर फाउंडेशन पदग्रहण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जतमधील युवा व्यावसायिकांनी एकत्र येत स्थापन केलेल्या सीएसआर फाउंडेशनचा या वर्षासाठीचा पदग्रहण समारंभ सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा मान्यवरांच्या हस्ते पार पडला. या वर्षासाठी सीएसआरच्या अध्यक्षपदी सागर मेहेत्रे, सचिवपदी सागर मांडगे तर खजिनदारपदी अविनाश नेवसे यांची निवड करण्यात आली. पदग्रहण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय नगरकर होते. यासह सर्व सामाजिक संघटनेचे शिलेदार सेवानिवृत्त वनाधिकारी अनिल तोरडमल, समर्थ विद्यालयाचे प्राचार्य रोटरीचे चंद्रकांत राऊत आदी उपस्थित होते.




सन्मान सोहळ्यास उत्तर देताना नूतन अध्यक्ष सागर मेहेत्रे म्हणाले की, सीएसआर फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांसोबतच सदस्यांमधील मैत्री दृढ करणे तसेच विविध व्यावसायिक वृद्धीसाठी एकमेकांना सहकार्य करणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले. यासह सामाजिक बांधिलकी, युवकांचा सहभाग घेत जीवनात सकारात्मक दृष्टीकोन ठेवत समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी नयन खंदारे, अविनाश नेवसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक सागर मांडगे यांनी केले तर आभार अनुज कुलथे यांनी मानले. या प्रसंगी अशोक दळवी, गणेश मेहेत्रे, सचिन गोरे, शहाबाज आतार, मयूर शहाणे, विकास गोरे, रविंद्र काळे, अशोक तांबे, तुषार नेवसे, किरण शिंदे, नितिन राऊत,अमोल गर्जे आदी सदस्य सहकुटुंब उपस्थित होते.

# जमीन घोटाळा : मुख्य सूत्रधाराचा सर्वोच्च न्यायालयातही जामीन फेटाळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा येथील चर्चच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणात दररोज नवनवीन खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सतिष डॅनियल भालेराव याचा अटकपूर्व जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने (डींशिाश ऊींी) फेटाळून लावला आहे. या निकालामुळे आरोपींच्या गोटात खळबळ माजली असून, पोलिसांनी या तपासात आता रॉबर्ट वसंतराव गायकवाड या पाचव्या आरोपीलाही निष्पन्न केले आहे. श्रीगोंदा शहर नजीक घोडेगाव रोडवरील चर्चच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गैरव्यवहार घोटाळ्याची पार्श्वभूमी मध्ये फसवणुकीचा आकडा मोठा असून बनावट कागदपत्रांच्या आधारे सुमारे १ कोटी ८७ लाख रुपयांची शासकीय व निमशासकीय जमीन हडपण्याचा हा डाव होता.

आरोपींनी 'इंडियन केनेडीयन प्रेसबिटेरियन मिशन' आणि 'दि कॉन्फरन्स ऑफ चर्चेस ऑफ क्राईस्ट' या संस्थांचे बनावट लेटरहेड आणि शिक्के वापरून तहसील कार्यालयाची दिशाभूल केली.या प्रकरणात सरकारकडून मोठ्या प्रमाणात कारवाई करत तहसीलदार क्षितिजा वाघमारे यांच्यासह नायब तहसीलदार अमोल बन यांना निलंबित केले होते तसेच आतापर्यंत दिपक गायकवाड, वैभव पारधे आणि संदीपान तुपारे या आरोपींना अटक करण्यात आली असून, ते सध्या पोलीस कोठडीत आहेत.यातील एक आरोपी सतीश डॅनियल भालेराव हा अटकेपासून बचाव करण्यासाठी कनिष्ठ न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली होती. मात्र, गुन्ह्याचे स्वरूप आणि फसवणुकीची व्याप्ती लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने त्याला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला.

न्यायालयाने आरोपीला दोन आठवड्यांत हजर होण्याचे आदेश दिले होते, परंतु त्याचे पालन न झाल्याने आता पोलीस त्याच्या मुसक्या आवळण्याच्या तयारीत आहेत.तपासादरम्यान पोलिसांना या रॅकेटमध्ये आणखी एका व्यक्तीचा सहभाग असल्याचे पुरावे मिळाले आहेत. बारामती येथील रॉबर्ट वसंतराव गायकवाड (वय ६३) याला या गुन्ह्यात पाचवा आरोपी म्हणून निष्पन्न करण्यात आले आहे. संस्थेच्या जमिनीच्या व्यवहारात आणि बनावट कागदपत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेत त्याचाही सक्रिय सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.या गैरव्यवहार प्रकरणात तत्कालीन काही महसूल अधिकाऱ्यांची भूमिकाही संशयास्पद असल्याचे समोर आले आहे.

तत्कालीन तहसीलदार क्षितिजा वाघमारे आणि नायब तहसीलदार अमोल बन यांना निलंबित करण्यात आले होते तर इतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे पाठवण्यात आला आहे.श्रीगोंदा पोलिसांनी या प्रकरणातील धागेदोरे कोल्हापूर, बारामती आणि अहमदनगरपर्यंत शोधले असून, लवकरच यातील सर्व आरोपी गजाआड होतील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या गुन्ह्यात आरोपींवर भारतीय दंड संहिता (खझड) कलम ४०६, ४१७, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२३, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घोटाळ्यात आणखी काही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी सामील आहेत का, याचा तपास सुरु आहे.

### अशी झाली फसवणूक :

१. बनावट जाहिरात आरोपींनी बारामती येथील 'वतन की लकीर' या साप्ताहिकात स्वतःला संस्थेचे सचिव आणि अध्यक्ष असल्याचे भासवून खोटी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती.

२. शासकीय यंत्रणेची दिशाभूल: आरोपींनी बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसील कार्यालय, श्रीगोंदा यांची दिशाभूल करून ७/१२ उताऱ्यावर स्वतःची नावे लावून घेतली.

३. आर्थिक व्यवहार: आरोपी संदीपान तुपारे याने ही जमीन दिपक गायकवाड याच्याकडून विकत घेण्याचा व्यवहार केला आणि त्यापोटी ३ लाख रुपयांचा चेक व १८ पोस्ट डेटेड चेक दिल्याचे तपासात समोर आले आहे.

# पाळणा दराबाबत प्रशासनाने भूमिका घ्यावी; संभाजी ब्रिगेडची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : राष्ट्रसंत शेख महंमद महाराज यांचा यात्रा उत्सव शुक्रवार दि. २७ फेब्रुवारीपासून सुरू होत असून, श्रीगोंदा शहरात वर्षानुवर्षे विनापरवाना पाळणे लावून अवास्तव तिकीट दर आकारले जात असल्याने गोरगरीब यात्रेकरूंची आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संभाजी ब्रिगेडने श्रीगोंदा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पा भगत व नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांना निवेदन दिले.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राऊत, तालुकाध्यक्ष शाम जरे, उपाध्यक्ष दिलीप लबडे, संघटक संतोष आरडे मेजर, आरपीआयचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ जगताप, सामाजिक कार्यकर्ते युवराज पळसकर आदी उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडने प्रशासनाने तातडीने शांतता समिती, पाळणा व्यावसायिक, यात्रा कमिटी आणि नागरिकांची संयुक्त बैठक घेऊन पाळण्याचे दर माफक ठेवण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच नगरपरिषदेने पाळण्यासाठी आरेखन करून अधिकृत जागा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून प्रशासनाचा महसूल बुडणार नाही आणि पाळण्याचे दरही नियंत्रित राहतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याप्रमाणे अनेक मुद्देही या निवेदनात मांडले आहेत. दरम्यान, या मागण्यांवर प्रशासनाने कारवाई न केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने समविचारी पक्ष, संघटना व नागरिकांना सोबत घेऊन शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच याबाबतचे निवेदन तहसीलदार, मुख्याधिकारी व पोलिस निरीक्षक यांनाही देण्यात आले असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडने दिली.

# श्री नागेश्वर यात्रोत्सवाची कुस्त्यांच्या हगाम्याने सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी** : नगर जिल्ह्यातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असणाऱ्या पारनेर तालुक्यातील आदर्शगाव भाळवणी येथील ग्रामदैवत भगवान नागेश्वराच्या वार्षिक यात्रोत्सवाची सांगता चित्तवेधक कुस्त्यांच्या फडाने झाली. दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त श्री नागेश्वराची पाच दिवस यात्रा भरते. तीन दिवस 'शिवलीलामृत' पारायण व महाशिवरात्रीच्या दिवशी सुमारे १५० जोडप्यांच्या उपस्थितीत रात्री महालघूरुद्राभिषेक व संपुर्ण दिवसभर यात्रा तसेच रात्री छबिना मिरवणूक आणि दुसऱ्या दिवशी यात्रा कमिटीच्या वतीने कुस्ती प्रेमींसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठा व दिर्घकाळ चालणारा हगामा असल्याने या हगाम्यासाठी राज्यासह परराज्यातील मल्लांनी आवर्जून हजेरी लावली होती. मल्लांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली, तसेच कुस्ती प्रेमींसाठी आखाड्याच्या चहूबाजूंनी सावलीसाठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. भाविकांच्या मनोरंजनासाठी रात्री गौरव महाराष्ट्राचा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संतोष भुजबळ, भाऊसाहेब रोहोकले, पोपट रोकडे, शंकर रोहोकले, रमेश रोहोकले, शैलेश रोहोकले, संभाजी आमले, नामदेव रोहोकले, प्रमोद गोडसे, मयुर रोहोकले, सुरज भुजबळ, गणेश जाधव, नाना चेमटे आदींची आखाड्यात उपस्थिती होती.

# मळ्यात होत ते शाळेत आणलं

## बालआनंद मेळावा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : मळ्यात होत ते शाळेत आणले, घरात बनवून बाजारी मांडलं शेजारच्या त्या चंदा काकू आल्यात बाजारला जवा बोबडे गण्या हा लागला नोटाच मोजायला, अशा उत्साही वातावरणात शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद बाजार उत्साहात झाला. या बाजारात ३० स्टॉल्सवर अडीच तासांत तब्बल सुमारे १० हजार रुपयांची उलाढाल झाली.या आनंदी बाजाराचे उद्घाघाटन सरपंच, उपसरपंच, व सदस्याच्या व पालकांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले.

मुख्याध्यापक संगीता बडे यांनी आनंदी बाजाराचे महत्त्व सांगितले.







विद्यार्थ्यांना बेरीज वजाबाकी गुणाकार भागाकार आदि गणिती क्रियां बरोबरच वजन मापे दुर्मिळ पदार्थ भाज्यांची ओळख व गणितीय संबोध पक्के होण्यासाठी आनंदी बाजार एक महत्वाचा दुवा असल्याने सर्व शिक्षकांच्या परिश्रमांतून बाल आनंदी बाजारचे नियोजन करण्यात आल्याचे नमूद केले.भाजीपाला विक्री केंद्राचे व्यवस्थापन शिक्षक संपत तुतारे सतोंष काळे व शिक्षिका अर्चना नजन यांनी केले. विद्यार्थ्यांनी विक्री बरोबरच खरेदीचाही आनंद लुटला. बालकांनी मात्यापित्यांच्या सहकार्याने हट्ट धरून विक्रीसाठी विविध पदार्थ आणले होते.

ग्रामस्थांनीही बाजारात आणलेल्या रुचकर पदार्थांची खरेदी करून मनसोक्त आस्वाद घेतला. सुमारे दोन ते अडीच तास चाललेल्या या बालआनंदी बाजारात सुमारे १० हजार रुपयांची उलाढाल झाली. यातून विद्यार्थ्यांनी व्यवहारीक ज्ञान प्राप्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गट शिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, गटविकास अधिकारी सोनल शहा यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिवजयंतीच्या शुभेच्छा फलकावरून पाथर्डीत राजकीय वाद पेटला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : शहरातील वसंतराव नाईक चौक येथे शिवजयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या शुभेच्छा फलकामुळे अनपेक्षितपणे राजकीय वातावरण तापले आहे. १९ फेब्रुवारीच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी नगरपरिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या या बॅनरवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याधिकारी, स्वीकृत सदस्य आणि सत्ताधारी नगरसेवक-नगरसेविकांची नावे झळकली; मात्र अपक्ष नगरसेविका दीपाली रामनाथ बंग यांच्यासह चार विरोधी नगरसेवकांची नावे नसल्याने संतापाची ठिणगी पडली.

आपली व इतर विरोधी सदस्यांची नावे जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचा आरोप करत नगरसेविका दीपाली बंग यांनी माजी नगरसेवक रामनाथ बंग यांच्यासमवेत थेट नगरपरिषद गाठली. मुख्याधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये जाऊन त्यांनी जाब विचारला. यावेळी माझे नाव कोणीही टाकू शकते, असे मुख्याधिकाऱ्यांनी उत्तर दिल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. नगरपरिषदेच्या अधिकृत नावाने लावण्यात आलेल्या बॅनरबाबत अशी भूमिका मांडली गेल्याने प्रशासनाच्या जबाबदारीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घटनेनंतर दीपाली बंग यांनी नगरपरिषद कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले.



कार्यक्रम पत्रिका आणि शुभेच्छा फलकांवर केवळ निवडक लोकप्रतिनिधींची नावे व छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आल्याने इतर सदस्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली. विशेष म्हणजे, बॅनर कोणी लावला, कोणाच्या परवानगीने लावला, याबाबत प्रशासनाकडे कोणतीही ठोस माहिती नसल्याचे सांगण्यात आले. बॅनरवर स्पष्टपणे पाथर्डी नगरपरिषद असे नमूद असतानाही प्रशासन अनभिज्ञ असल्याचे समोर आल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

या निमित्ताने शहरातील बॅनर संस्कृतीचा मुद्दाही पुन्हा ऐरणीवर आला आहे. चौकाचौकात, मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लावले जाणारे फ्लेक्स व फलक शहराचे विद्रूपीकरण करत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. नगरपरिषदेने बॅनरसाठी निश्चित जागा ठरवल्याचा दावा केला जात असला तरी नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे नगरपरिषदेच्या प्रशासनिक नियंत्रणावर आणि पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. बॅनर प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, दोषींवर कारवाई करावी आणि भविष्यात सर्व लोकप्रतिनिधींना समान वागणूक देण्याचे स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी ठाम मागणी आंदोलनावेळी करण्यात आली.

अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला असून, शिवजयंतीच्या निमित्ताने सुरू झालेला हा वाद पुढील काही दिवस शहराच्या राजकारणात चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे आहेत.

# ढोरानदी पात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा जोमात



महसूलचे दुर्लक्ष



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव :** शेवगावच्या पश्चिम भागाची वरदान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ढोरानदी पात्रात गेल्या काही दिवसांपासून राजरोसपणे रात्री बरोबरच दिवसाढवळ्याही वाळूची वाहतूक सुरू असून वाळू बरोबरच मुरूम, गौण खनिज तस्करीचे स्तोम मोठ्या प्रमाणात सुरू असून जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिलेल्या आदेशालाही प्रशासनाकडून केराची टोपली मिळत आहे.

शेवगाव तालुक्याचा पश्चिम भाग हा ढोरा नदीवरील बंधाऱ्यांच्या मालिकेमुळे जलसमृद्ध बनला असून मागील वर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे नदीला महापूर आल्याने पाण्याबरोबरच मोठ्या प्रमाणावर वाळू वाहून आली. नदीचे पाणी कमी झाल्याबरोबर या सोन्यासारख्या वाळूवर तस्करांची नजर पडली आणि ढोरजळगाव परिसरातील ढोरजळगाव, आपेगाव,आखतवाडे, मळेगाव, सामनगाव, वडुले,वाघोली येथील नदीपात्रात अक्षरशः तस्करांची झुंड पडली असून राजरोसपणे रात्री बरोबर दिवसाढवळ्याही ट्रॅक्टर, डंपर व इतर साधनांच्या साह्याने वाळू वाहतूक सुरू आहे. घरकुलासाठी मोफत वाळू देण्याची घोषणा करणाऱ्या शासनाकडून मात्र प्रत्यक्ष या आदेशाची अंमलबजावणी होत नसून गोरगरिबांना घरे बांधण्यासाठी हक्काची वाळू सोन्याच्या भावात खरेदी करावी लागत आहे. नदीमध्ये उतरून जेसीबी किंवा कामगारांच्या साह्याने वाळू उपसा होत असल्याने मोठमोठे खड्डे नदीपात्रात पडले असून याच खड्ड्यांमुळे मागील वर्षी सामनगाव येथे पोहण्यासाठी उतरलेल्या शिक्षकाचा बुडून मृत्यू झाला होता. यामुळे पर्यावरणाचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन ऐन उन्हाळ्यात भूजल पातळी खालावून शेतकऱ्यांसमोर पाण्याचे संकट उभा राहण्याची शक्यता आहे. या तस्करांना कुणाचे भय राहिले नसून. वाळू बरोबरच मुरूम तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू असून अल्प रॉयल्टी भरून मोठ्या प्रमाणावर मुरूम उचलायचा किंवा रॉयल्टी न भरताच जेसीबीच्या साह्याने अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर मुरूम उपसा सुरू असून मोठ्या प्रमाणावर शासनाचा महसूल बुडवला जात आहे. ही वाहने दिवसाढवळ्या मोठ्या वेगाने हॉर्न वाजवत रस्त्यावरून धावत असल्याने अपघात होण्याची ही मोठी शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर महसूल व पोलीस प्रशासनाच्या चुप्पी ने नागरिक देखील संभ्रमात आहेत.

## द•ख•ल

### बी जे खताळ जनता विद्यालयात विद्यार्थ्यांना निरोप



**संगमनेर खुर्द :** धांदरफळ खुर्द येथील बी जे खताळ जनता विद्यालय २०२५ २६ या वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संचालक दत्ता कोकणे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश शिंदे, तसेच माजी मुख्याध्यापक अत्तर ,भालेराव, यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करताना दहावीचे वर्ष आपल्या जीवनात अतिशय महत्त्वाचा आहे. दहावीच्या निकालावरती पुढील शिक्षणाची रणनीती ठरते त्याचप्रमाणे विद्यालयाचा निकाल परंपरेनुसार शंभर टक्के लागतो आणि तो निकाल याही वर्षी शंभर टक्के निकाल लागेल अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता दीपक खताळ व कु. फटांगरे सारिका मनोगत ठोंबरे साक्षी, श्रीकांत, म्हस्कुले, निशा गणेश या विद्यार्थिनी मनोगत व्यक्त केले.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासाठी प्रत्येक वर्गात सिलिंग फॅन भेट म्हणून दिला.

### दोन दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण सुरू




**संगमनेर खुर्द :** निमगाव बु., ता. संगमनेर, जिल्हा-अहिल्यानगर येथे केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या केंद्रिय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र नाशिकच्या वतीने रब्बी हंगाम २०२५-२६ साठी दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दोन दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्धाटन समारोह गावातील विठ्ठल रुख्मिणी मंदिरामध्ये थाटामाटात पार पडला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे उप निदेशक डॉ. अतुल ठाकरे यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. गावचे सरपंच सोमनाथ कानवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रशिक्षणात भाजीपाला तसेच मका आणि इतर पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमस्थळी विविध प्रकारचे सापळे, जैविक कीटकनाशके व फवारणी करताना वापरावयाच्या सुरक्षासाधनांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.यासही शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

### आई-वडील व गुरुजनांचा आदर करा : नजन

**ढोरजळगाव :** विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त व तणावमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे, व्यसन व मोबाईलपासून दूर राहून चांगली संगत आत्मसात करावी आणि आई-वडील, गुरुजन व थोरामोठ्यांचा आदर करून सुजाण नागरिक बनावे, असे आवाहन प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन यांनी केले.जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव संचलित भातकुडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एसएससी बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा व निरोप समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी श्रीराम माध्यमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्रीधर मुरकुटे व प्रा. सुनील कराळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वखर्चातून विद्यालयास ८ हजार रुपये किमतीचे दोन ग्रीन बोर्ड व संगणक कक्षासाठी ४ हजार रुपये किमतीचे होम थिएटर भेट दिले. श्रीधर मुरकुटे यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना योग्य दिशा देण्याचे कार्य शिक्षक करत असल्याचे सांगितले.

# संस्था तुमच्या पाठीशी ठामपणे उभी राहील : पृथ्वीसिंह काकडे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** विद्यार्थी हा समाजशील घटक आहे .तुमच्या जीवनात कधीही काहिही अडचण येऊ द्या. अडचणीच्या काळात संस्था तुमच्या पाठीशी ठामपणे उभी राहील असे प्रतिपादन संस्थेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंहभैय्या काकडे यांनी केले .चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी विद्यार्थी निरोप व सदिच्छा कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी ते अध्यक्ष स्थानाहून बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर,अशोक आघवणे, संजय मरकड,संजय दुधाडे वत्सला जाधव, दादासाहेब ज्योतीक, शितल गोरे, जालिंदर मारेकर, हरीष केदार आदी मान्यवर उपस्थित होते . पृथ्वीसिंह काकडे पुढे म्हणाले की, मित्र हे विचारपूर्वक निवडा. मला विद्यार्थ्यांना सी.ए.डॉक्टर, इंजिनियर झालेले दिसले पाहिजे.

विद्यालय,शिक्षक यांना जीवनात कधी विसरू नका. उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण आपल्या मनोगतात म्हणाल्या की, तुम्ही एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे जाण्यास तयार आहात. कॉफीमुक्त, तणावरहित, भयमुक्त पद्धतीने परीक्षेस सामोरे जा . ही परीक्षा म्हणजे आयुष्याची शेवटची परीक्षा नाही. निराश होऊ नका असा मार्मिक सल्ला त्यांनी दिला. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुरेश भापकर, भारत म्हस्के यांनी देखील विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सृष्टी जाधव, समृद्धी काळे, आरती काळे, प्रथमेश तानवडे, पुष्कर वावरे, साई गोर्डे,ज्ञानेश्वरी पातकळ, गायत्री पातकळ यांनी देखील आपले मनोगत यावेळी व्यक्त केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुधाडे,अनुमोदन संजय मरकड तर आभार सुदर्शन गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले

## परीक्षा बंदोबस्तावरील होमगार्डचा भीषण अपघातात मृत्यू



**पाथर्डी :** तालुक्यात रविवारी सायंकाळी घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे. SSC/HSC परीक्षा २०२६ च्या बंदोबस्तावर कर्तव्य बजावत असलेले होमगार्ड जवान उमेश जगन्नाथ औटी व त्यांच्या मातोश्रींचा दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला.

कर्तव्यावर असलेल्या जवानाचे असे अकाली निधन झाल्याने होमगार्ड पथकासह पोलीस प्रशासन आणि नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

उमेश औटी हे पाथर्डी पोलीस स्टेशनअंतर्गत एम. एम. निऱ्हाळी विद्यालय येथे परीक्षा बंदोबस्तासाठी पेपर गार्ड म्हणून नेमणुकीस होते. परीक्षा काळात शांतता व शिस्त राखण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती.

रविवारी दुपारी सुमारे तीनच्या सुमारास ते आपल्या आई व लहान मुलासह दुचाकीवरून प्रवास करत असताना कोरडगाव रोडवरील टाकळी फाट्याजवळ भीषण अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की, उमेश औटी आणि त्यांच्या मातोश्रींचा जागीच मृत्यू झाला, तर मुलगा बचावला.

उमेश औटी हे शांत, संयमी आणि कर्तव्यदक्ष जवान म्हणून ओळखले जात होते. प्रत्येक जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडत असत. परीक्षा बंदोबस्तासारख्या संवेदनशील कामातही त्यांनी नेहमी दक्षता दाखवली होती. त्यांच्या अचानक जाण्याने सहकाऱ्यांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

या दुर्दैवी घटनेने पाथर्डी तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून सर्व स्तरांतून औटी कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत. कर्तव्य बजावत असताना आयुष्याचा प्रवास थांबलेला हा जवान आणि त्यांची मातोश्री यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.

## पाल्यांची प्रगती आई-वडिलांच्या आयुष्याची जमा-पुंजी : पो. उपाधीक्षक लोखंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**कर्जत :** आयुष्यात प्रत्येक ठिकाणी परीक्षा द्यावी लागते. जो निरंतर अभ्यास करतो, त्याचे अवलोकन करून उत्तम मांडतो. त्यानुसार तो यशाची पायरी चढतो. आणि सफल होतो. परीक्षा म्हंटले की यशा-पयश निश्चित असले तरी जे करू ते सर्वोत्तम करू हा विश्वास जो बाळगतो तोच स्पर्धेच्या युगात चमकतो. विद्यार्थ्यांनी कठीण प्रसंगास कायम सामोरे जावे. याने आत्मविश्वास वाढतो. मात्र त्या आत्मविश्वासाचे रूपांतर अहंकारात होऊ देऊ नका असे आवाहन कर्जतचे पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे यांनी केले. ते धाकोजी महाराज माध्यमिक विदयालयाच्या विविध गुणदर्शन सन्मान सोहळा आणि दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होते.

या कार्यक्रमास सिने अभिनेते हास्यकवी गजानन पटूरकर, गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी, महावितरणचे कौस्तुभ डबीर, संस्थेचे अध्यक्ष नगरसेवक प्रसाद ढोकरीकर, ड. कैलास शेवाळे, प्रवीण घुले, सुनील शेलार, अंबादास पिसाळ, अनिल गदादे, अशोक खेडकर, सर्व सामाजिक संघटनेचे अनिल तोरडमल, विजय तोरडमल आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना पोलीस उपअधीक्षक लोखंडे म्हणाले की, शालेय जीवनात प्रत्येकाने आपले जीवनमान महापुरुषांच्या विचाराने चालवले पाहिजे. समाजाप्रती असणाऱ्या जबाबदाऱ्या, त्याचे आचरण यानुसार जगले तर तुमचा नावलौकिक शाळेसह गावात आणि इतर ठिकाणी देखील आदराने घेतला जातो. तरुणाई भरकटल्याची अनेक उदाहरणे समोर आढळतात.

शाळा संस्कार, गुरुजनांचा आदर आणि आईवडिलांचे ऋण कायम लक्षात ठेवा. त्यांचे कष्ट आयुष्यात कधीच विसरू नका. कारण त्यांची आयुष्याची जमा-पुंजी आपल्या पाल्यांची प्रगती होय.

या प्रसंगी विद्यालयातील क्रीडा, चित्रकला व विज्ञान परीक्षेत संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यासह माजी सैनिक कर्तुत्व गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व सामाजिक संघटनेचे शिलेदार भाऊसाहेब रानमाळ आणि बाल संशोधक यश श्रीपाद आडकर याने स्टेट युनिवर्सिटी ऑफ न्युयार्कची शिष्यवृत्ती प्राप्त केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. कर्जत मधील सर्व सामाजिक संघटनेस श्रमदानासाठी लागणाऱ्या साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीपाद आडकर यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक कय्युम मोमीन यांनी मानले.

## १० गावांना जिमचे साहित्य खरेदीसाठी निधी



**कोळपेवाडी :** ग्रामीण भागातील ग्रामीण भागातील युवकांच्या सशक्त शरीरयष्टी आणि निरोगी जीवनशैलीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आ.आशुतोष काळे यांनी केलेल्या पाठपुराव्यातून कोपरगाव मतदारसंघातील १० गावांना जिम साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी ०७ लाख याप्रमाणे ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात आरोग्याच्या दृष्टीने मजबूत शरीरयष्टी, शारीरिक तंदुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे. पोलीस, लष्कर, अग्निशमन दल तसेच विविध शासकीय भरती प्रक्रियेत शारीरिक फिटनेस चाचणीमध्ये कित्येक तरुणांच्या संधी हुकतात. त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणांनाही शहरांतील तरुणांप्रमाणे अत्याधुनिक व्यायाम साधनांची सुविधा मिळावी, या उद्देशातून केलेल्या पाठपुराव्यातून हा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. या निधीतून कोपरगाव मतदार संघातील वारी, मायगाव देवी, डाऊच खु., कारवाडी, भोजडे, ब्राम्हणगाव, काकडी, डाऊच बु, आपेगाव आणि मढी बु. या दहा गावांना व्यायाम शाळांसाठी आधुनिक जिमचे साहित्य देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील युवकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# दलालाकडून शेकडो अपंगांची फसवणूक

## अपंग संघटना आक्रमक, न्यायासाठी आंदोलनाचा पवित्रा

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून अपंग व्यक्तींच्या शासकीय योजना आणि सवलतींचा फायदा मिळवून देण्याच्या नावाखाली काही लुचाड दलालांनी उच्छाद मांडला आहे. हक्काच्या मदतीसाठी पायपीट करणाऱ्या अनेक दिव्यांग बांधवांची आर्थिक फसवणूक झाल्याचे समोर आले असून, याप्रकरणी आता प्रशासन कठोर पावले उचलण्याच्या तयारीत आहे. नागरिकांच्या वाढत्या दबावानंतर दोषी दलालांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याचे संकेत मिळत आहेत.

नुकत्याच मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा तालुक्यातील विविध गावांमध्ये कार्यरत असलेल्या काही दलालांनी 'घरकुल', 'पेन्शन' आणि 'साहित्य वाटप' अशा योजनांचे आमिष दाखवून अपंगांकडून कागदपत्रे गोळा करत मोठ्या रकमा वसूल केल्या आहेत.हात पाय अथवा विविध प्रकारच्या अपंगत्वाने पीडित असलेल्या व्यक्तीला पोटाचे खळगे भरण्यासाठी चालू असलेली धडपड आणि त्यातून झालेली फसवणूक मन हेलवणारी आहे याच अपंगाचे दलाल शासकीय कार्यालयात आपले तसेच राजकीय वजन असल्याचे भासवून हे दलाल निराधार आणि गरजू दिव्यांगांची लूट करत असल्याचे समोर आले आहे.याचे मोठ्या प्रमाणात नेटवर्क असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे या फसवणुकीमुळे संतापलेल्या नागरिकांनी दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी लावून धरली



आहे. दरम्यान, वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय यासह तालुक्यातील अनेक अपंग संघटना आता एकवटल्या आहेत.विविध अपंग संघटनांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर या बेलगाम दलालांचा बंदोबस्त केला नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल.असा इशाराही देण्यात आला आहे तसेच फसवणूक झालेल्या दिव्यांगांचे पैसे परत मिळवून द्यावेत आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ विनासायास मिळावा, अशी प्रमुख मागणी संघटनांनी केली आहे.या तक्रारींची दखल घेत प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा दलालांची माहिती संकलित केली जात असून, ज्यांनी फसवणूक केली आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणत्याही नागरिकाने कामासाठी दलालांना पैसे देऊ नयेत, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### हे पाप कुठे फेडणार ? – संघटना प्रतिनिधी

**अपंग बांधवांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणे हे पाप आहे. ज्याने हे कृत्य केले आहे तो हे महापाप कुठे फेडणार आहे जिल्हास्तरीय अपंग संघटनांनी असे गैरकृत्य करणाऱ्या दलालांची नावे प्रशासनाला सादर केली असून, त्यांच्यावर कडक कारवाई झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसटद्वारे कळविण्यात येते की, कै. उद्धव कोंडिराम मरकड (रा.सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) हे दिनांक ०९/०१/२०२५ रोजी स्वास्थ्य हॉस्पिटल अहिल्यानगर (पाठक हॉ.) येथे मयत झाले आहेत. ते जिल्हा परिषट अहमदनगर अंतर्गत प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीस होते.

त्यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे आहेत :

१) सौ. सुनिता उद्धव मरकड (पत्नी), वय ५१ वर्षे
२) श्री. चैतन्य उद्धव मरकड (मुलगा), वय २३ वर्षे
३) कु. श्रावणी उध्दव मरकड (मुलगी), वय १५ वर्षे

वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे मे. तहसीलदार साहेब, पाथर्डी यांच्याकडे फॅमिली पेन्शनची रक्कम मिळणेबाबत, प्रोव्हिडंट फंड (PF), स्थावर व जंगम मालमत्ता, सानुग्रह अनुदान व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करणेकामी 'कायदेशीर वारस प्रमाणपत्र' मिळण्यासाठी अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर वारस प्रमाणपत्र मिळण्यास कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ (सात) दिवसांच्या आत** मे. तहसीलदार साहेब, पाथर्डी यांच्याकडे लेखी स्वरूपात कागदपत्रांसह आपली हरकत नोंदवावी.
मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास
कोणाचीही हरकत नाही असे समजून पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक: १५/०२/२०२६
ठिकाण: पाथर्डी

**जाहीर नोटीस देणार तर्फे :**
**सौ. सुनिता उद्धव मरकड व इतर**
**रा. सोनई, ता. नेवासा**

आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२८ । बुधवार १८ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## इम्रान खान यांच्या मदतीला सुनील गावस्कर, कपिल देव सरसावले!



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि १९९२ च्या वर्ल्डकप संघाचे कर्णधार इम्रान खान यांच्या खालावलेल्या प्रकृतीवरून जागतिक क्रिकेट वर्तुळातून तीव्र पडसाद उमटत आहेत. हिंदुस्थानचे महान फलंदाज सुनील गावस्कर आणि १९८३ च्या वर्ल्डकप विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव यांच्यासह जगातील १४ दिग्गज माजी कर्णधारांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांना पत्र लिहून इम्रान खान यांना'तातडीने वैद्यकीय सुविधा आणि मानवीय वागणूक देण्याची मागणी केली आहे.

इम्रान खान (वय – ७३) सध्या रावळपिंडीतील अदियाला तुरुंगात असून गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीबाबत चिंताजनक बातम्या समोर येत आहेत. विशेषतः इम्रान खान यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी ८५ टक्क्यांनी कमी झाल्याचा अहवाल समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर क्रिकेट जगतातील दिग्गजांनी एकत्र येत पाकिस्तान सरकारकडे धाव घेतली आहे. सुनील गावस्कर, कपिल देव यांच्यासह जगभरातील १४ माजी कर्णधारांनी पाकिस्तान सरकारला पत्र पाठवले आहे. मैदानावरचे आमचे वैर स्टंप काढले की संपते, पण आदर कायम राहतो. इम्रान खान यांनी खेळाडू म्हणून जगभरातील पिढ्यांना प्रेरित केले आहे. त्यांना योग्य कायदेशीर आणि वैद्यकीय सन्मान मिळायला हवा, असे या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

## महत्त्वाचे..

### आरटीई प्रवेश : अर्ज सादर करण्यासाठी १० मार्चपर्यंत मुदत

पुणे : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. पालकांना १० मार्चपर्यंत https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावरून अर्ज करता येणार आहे. ही प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली आहे. आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीचे बिगुल वाजले!

## २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेला सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात संपत आहे, तसेच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरु होणार असून ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील.

तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील.

जिल्हाधिकाऱ्यांकडून संक्षिप्त तपासणी झाल्यानंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावाला मान्यता देईल, असे ग्रामविकास विभागाने म्हटले आहे. याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागच्या सह सचिव वर्षा भरोसे यांनी जारी केले आहेत.

### ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना होणार प्रसिध्द

**ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेबाबत हरकती मागवण्यासाठी ७ एप्रिल २०२६ रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली जाईल. नागरिकांना आपल्या हरकती १३ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदवता येतील.प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी सुनावणी घेतील. जिल्हाधिकारी सर्व प्रस्तावांची पडताळणी करून २८ एप्रिल २०२६ पर्यंत प्रभाग रचना अंतिम करतील आणि ती राज्य निवडणूक आयोगाला सादर केली जाईल. तर दि.४ मे २०२६ रोजी अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी प्रसिध्द करणार आहे.**

# हर्षवर्धन सपकाळ नरमले!

## टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना केल्याबद्दल मागितली माफी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** मुंबई : राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून टिपू सुलतान वरुन वाद निर्माण झाला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची आणि टिपू सुलतान यांची तुलना केली. यावरुन मोठा वाद निर्माण झाला. मालेगाव महापालिकेमध्ये टिपू सुलतानचा फोटो लावल्याचे समर्थन करताना असे वक्तव्य केले. यावरुन मोठा वाद निर्माण झाला. सोशल मीडियावर पोस्ट करुन हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर माफी मागितली आहे. **(पान ४ वर)**

**ट्रेड-दिल व जेफ़री एपस्टीन घोटाळा चव्हाट्यावर आणू**

शिवजयंती दोन दिवसांवर आली आहे, आपण सर्वांनी गैरसमज दूर ठेवूया, अपप्रचाराला बळी पडू नका. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला स्वराज्य, सहिष्णुता आणि लोककल्याणाचा मार्ग स्वीकारून परस्पर आदर, ऐक्य आणि समन्वयाने महाराष्ट्र घडवूया ही नम्र विनंती. आणि पुढे भाजपाच्या विखारी, खोडसाळ अपप्रचाराविरुद्ध लढत राहू भाजपच्या विकृतीला व ट्रेड-दिल व जेफ़री एपस्टीन घोटाळा चव्हाट्यावर आणत राहू!' – हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

# राज्यात ११ नवे अतिरिक्त जिल्हाधिकारी

## राजूर, घोडेगावसह ६९ अतिरिक्त तहसील कार्यालये

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील मुकुंदनगर, सावेडी उपनगरातील तपोवन रस्ता परिसर व कोठला भागात रविवारी (१५ फेब्रुवारी) पहाटेपासून महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) गुप्त छापेमारी मोहीम राबवून १२ घरांची झडती घेतली. सुमारे १०० ते १२५ अधिकारी-कर्मचार्यांच्या पथकाने एकाच वेळी विविध ठिकाणी कारवाई करत लॅपटॉप, मोबाईलमधील डिजिटल डेटा, संशयास्पद पुस्तके व कागदपत्रे ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ही कारवाई अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली होती. पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास विविध वाहनांतून पथक शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांना केवळ बंदोबस्तासाठी कळविण्यात आले होते; तपासाच्या स्वरूपाची माहिती त्यांना देण्यात आली नव्हती. त्यामुळे कारवाईदरम्यान संबंधित परिसरात तणावपूर्ण शांतता आणि उत्सुकता निर्माण झाली होती. पहाटे ३ पासून सुरू झालेली तपासणी दुपारी तीनपर्यंत सुरू होती. मुकुंदनगरमधील १०, तपोवन रस्ता परिसरातील एक आणि कोठला भागातील एका घरात सखोल चौकशी करण्यात आली. डिजिटल उपकरणांमधील डेटा जप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कोणालाही ताब्यात घेण्यात आले नसले तरी काही तरूणांकडे कसून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. कारवाईदरम्यान पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, स्वतः कार्यालयात हजर झाले (पान ४ वर)

### प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालये

**पुणे विभागात पुणे जिल्ह्यात बारामती, सातारा जिल्ह्यात फलटण, तर सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर, कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यात कल्याण, तर रत्नागिरी जिल्ह्यात दापोली. नाशिक विभागात जळगाव जिल्ह्यात चाळीसगाव. छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड जिल्ह्यात किनवट. अमरावती विभागात अमरावती जिल्ह्यात अचलपूर, यवतमाळ जिल्ह्यात पुसद, बुलडाणा जिल्ह्यात खामगाव. नागपूर विभागात नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर.**

### प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालये

तालुका- गावाचे नाव

- अकोले- राजूर
- नेवासा- घोडेगाव
- कुर्ला- चेंबूर
- बोरिवली- मालाड
- अंधेरी- वांद्रे
- ठाणे- नवीन मुंबई
- कल्याण - डोंबिवली
- भिवंडी- भिवंडी (ग्रामीण)
- डहाणू- कासा
- वसई- विरार
- पालघर- बोईसर
- राजापूर- रायपाटण
- खेड- चाकण
- फलटण- साखरवाडी
- कराड- उंब्रज
- उत्तर सोलापूर- वडाळा
- चंदगड- नजरे कार्वे
- निफाड- लासलगाव
- सिन्नर- सिन्नर
- बागलाण- नामपूर
- जळगाव- जळगाव
- जामनेर- शेंदुर्णी
- चाळीसगाव- चाळीसगाव
- नंदूरबार- नंदूरबार
- शहादा- शहादा
- अक्कलकुवा- मोलगी
- शिरपूर- शिरपूर शहर
- सिल्लोड- अजिंठा
- बीड- नेकनूर
- आष्टी- कडा
- जालना- जालना शहर आणि राजूर
- परभणी- परभणी
- जिंतूर- बोरी
- लातूर- लातूर
- नांदेड- नांदेड
- हदगाव- तामसा
- मुखेड- मुक्रमाबाद
- किनवट- इस्लापूर
- अमरावती- अमरावती (ग्रामीण)
- अकोला- अकोला (शहर)
- पुसद- शेंबाळ पिंपरी
- उमरखेड- ढाणकी
- सिंदखेड राजा- साखरखेडा
- मेहकर- डोणगाव
- खामगाव- लाखनवाडा
- वाशीम- अनसिंग
- रिसोड- केनवड
- कारंजा- कामरगाव
- नागपूर (ग्रामीण)- बुटीबोरी आणि हुडकेश्वर
- हिंगणा- वानाडोंगरी
- नागपूर- नागपूर (शहर)
- कामाठी- वडोदा
- सावनेर- खापरखेडा
- काटोला- कोंढाळी
- नरखेड- जलालखेडा
- मौदा- कोदामेंढी
- कुही- वेलतूर
- हिंगणघाट- अल्लीपूर
- सेलू- सिंदी
- पवनी- अड्याळ
- चार्मोशी- आष्टी
- कुरखेडा- मालेवाडा
- आरमोरी- वैरागड
- धानोरा- पेंढारी
- सिंरोचा- आसरअल्ली
- एटापल्ली- कसनसूर
- अहेरी- जिमलगट्टा

# भीषण अपघात : चिमुकल्याचा मृत्यू

## तिघे जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** मलठण रस्त्यावरील आमदाबाद फाट्याजवळ रस्त्यावरील खड्ड्यांमुळे झालेल्या भीषण अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले असून तीन वर्षांच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम वभागाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे तेथील नागरिक सांगत आहे

शिरुर पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात १६ फेब्रुवारी रोजी दुपारी चार चार वाजण्याच्या सुमारास आमदाबाद-मलठण महामार्गांवर , माशेरेमळा येथे घडला फिर्यादी शिवम सत्यवान साळवे (रा. मलठण, ता. शिरूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कार चालक संदीप प्रभाकर पुंडे (रा. कान्हूर मेसाई, जि. पुणे) याच्याविरुद्ध मोटार



वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर अपघातात धिरज राजू पवळे (वय २४), त्यांची पत्नी वैभव धिरज पवळे (वय २१) व आई गोपिका राजू पवळे (वय ४५) हे तिघे जखमी झाले. त्यांच्या डोके, हात, पाय, छाती व मणक्याला गंभीर दुखापती झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्यासोबत असलेला तीन वर्षांचा विराज धिरज पवळे याचा मात्र उपचारादरम्यान मृत्यू झाला. सर्व जखमी व मृत बालक हे कोयाळी (ता. खेड, जि. पुणे) येथील रहिवासी आहेत. अपघातानंतर फिर्यादी साळवे यांनी तत्परता दाखवत जखमींना शिरूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र चिमुकल्याचे प्राण वाचवता आले नाहीत. प्राथमिक तपसता चारचाकी चालकाने वेग व निष्काळजीपणा केल्यामुळे अपघात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार अरुण उबाळे हे करत आहेत. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाढत्या अपघातांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली . सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणामुळे निष्पाप नागरीकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

# जन्मदात्या आईला भिंतीवर आपटले

## कात्री, अडकित्त्याने वार करून खून

**अहिल्यानगर:** अहिल्यानगर शहरातील सावेडी उपनगरात घडलेल्या एका भीषण घटनेने परिसर सुन्न झाला आहे. नवलेनगर, गुलमोहर रस्ता परिसरात पोटच्या मुलानेच आईचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप आणि अस्वस्थता पसरली आहे. मृत महिला बेबी गवारे या आपल्या मुलगा सुहास गवारे उर्फ मामा याच्यासोबत राहत होत्या. प्राथमिक माहितीनुसार, घरगुती कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. सुरुवातीला किरकोळ भांडण असलेला हा वाद काही क्षणांतच हिंसक स्वरूपात बदलला. संतापाच्या भरात सुहासने आईला मारहाण केली आणि भिंतीवर आपटले. त्यानंतर कात्री आणि अडकित्त्याने वार करून तिचा खून केल्याचे तपासात समोर आले आहे. घटनेनंतर आरोपीने स्वतःला घरात कोंडून घेतले. माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दरवाजा उघडून सुहासला ताब्यात घेतले आणि बेबी गवारे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला.परिसरातील (पान ४ वर)

### पोलिसांवरही हल्ला



सुहास गवारे याने आपल्या आईची हत्या करून स्वतःला खोलीत बंद करून घेतलं. त्यानंतर आईच्या मृतदेहाजवळ बसून तो गोट्या खेळू लागला. घटनेची माहिती मिळतात पोलीस घटनास्थळी दाखल झाले. विकृत तरुणाला बाहेर काढण्यासाठी पोलीस कर्मचारी प्रयत्न करत असताना तो पोलिसांना वस्तू फेकून मारत होता. अखेर पोलिसांनी त्याच्या डोळ्यावर मिरचीचे पाणी फेकले. त्यामुळे त्याला दिसेनासे झाले. त्यानंतर पोलिसांनी दरवाजा तोडून विकृत तरुणाला ताब्यात घेतले आहे.

# वांबोरी घाटात मृतदेह आढळला

**अहिल्यानगर :** वांबोरी परिसरातील डोंगरगण घाटांमध्ये १७ फेब्रुवारी रोजी, सकाळच्या दरम्यान, एका इसमाचा मृतदेह गोणीमध्ये घालून जाळलेल्या अवस्थेत आढळून आला. मृतदेहाची विल्हेवाट लावण्याच्या हेतूने, मृतदेह खोल दरीमध्ये फेकून देण्यात आला असा संशय आहे. सदर मृतदेहाच्या हातावर छत्रपती व छातीवर सोनाली आणि हातच्या अंगठ्यावर केके असे नाव गोंधलेले आहे.या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मृतदेहाची ओळख पटवून गुन्ह्याचा तपास लावणं, हे पोलिसांसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० च्या दरम्यान, एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीमध्ये असलेल्या



डोंगरगण घाटांमध्ये एक इसम सरपण तोडत होता. त्यावेळी, त्या इसमाला गोणीमध्ये घातलेला मृतदेह या ठिकाणी दिसून आला. त्यावेळी सरपण तोडणाऱ्या इसमाला दुर्गंधी येऊ लागल्याने, त्यांनी परिसरात पाहिलं असता, खताच्या गोणीमध्ये पुरुष जातीचा मृतदेह त्याला आढळून आला. त्यानं सदर घटनेची माहिती सरपंच आणि पोलिस प्रशासनाला दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, अहिल्यानगर येथील जिल्हा पोलिस उपअधीक्षक गिरीश वमने, तसेच हवालदार सतीश खामकर, अजिनाथ पालवे आदी पोलिस पथकानं घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. फॉरेन्सिक पथक आणि श्वान पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आलं. पोलिस पथकानं (पान ४ वर)

# १२ वी च्या विद्यार्थ्यांना कॉपी पुरविणारे २६ शिक्षक निलंबित!

- वाशिममध्ये १२वीच्या परीक्षेत सामूहिक कॉपीचा प्रकार उघड
- ५८१ विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांत समानता
- २६ शिक्षकांवर निलंबनाची कारवाई
- संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाशीम :** राज्यात सर्वत्र १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरु आहेत. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी वर्षभर मेहनत केली आहे. मात्र काही ठिकाणी उघडपणे कॉपीचे प्रकार सुरु आहेत. यासाठी शिक्षकच मुलांना मदत करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी २६ शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा प्रकार वाशिम जिल्ह्यातील महाविद्यालयात घडला आहे.

वाशिम जिल्ह्यातील 'टो इथल्या संत मैनागिरी महाराज विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयातील ५८१ विद्यार्थ्यांनी सामूहिक कॉपी केली. याप्रकरणी आता शिक्षण विभागाने या परीक्षा केंद्रावरच्या कर्मचाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारला आहे. २६ शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

या कर्मचाऱ्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचीही प्रक्रिया सुरू असल्याची माहिती, वाशिम जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांनी दिली आहे. काल इयत्ता बारावीच्या भौतिकशास्त्राच्या पेपर दरम्यान प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी परीक्षा केंद्रावर तपासणी केली असता काही विद्यार्थ्यांच्या उत्तरात समानता आढळून आली होती. त्यामुळं या ठिकाणचे सिसिटीव्ही तपाण्यात आले आणि विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव अमरावती बोर्डाकडे पाठवण्यात आला आहे.तर कर्मचाऱ्यांवर तात्काळ करण्यात आली आहे.

### बीडमध्ये कॉपीचा मास्टरांचा सुळसुळाट!

**बीडच्या गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे दगडाला बांधून कॉपी वर्गात टाकतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे एकीकडे जिल्हाधिकारी यांनी कॉपी मुक्त अभियान राबवले आहे. प्रत्येक वर्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. मात्र याच ठिकाणी काही तरुण कॉपी देत असतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने या संदर्भात काय दखल घेतली जाणार, हे देखील पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.**